# प्रकरण - १

# "नवकाव्य व नवकवी (१९५० नंतर) आणि मंगेश पाडगावकर"

- प्रास्ताविक
- बाळ सिताराम मर्ढेकर
- शरच्चंद्र मुक्तीबोध
- पु.शि. रेगे
- नवकाव्याचे दुसरे पर्व
- विंदा करंदीकर
- वसंत बापट
- इंदिरा संत
- दिलीप चित्रे
- मंगेश पाडगावकर
- सारांश

## प्रकरण - १

# "नवकाव्य व नवकवी (१९५० नंतर) आणि मंगेश पाडगावकर"

## प्रास्ताविक

मराठी कवितेचे प्राचीन, अर्वाचीन (आधुनिक) व "नव" असे स्थूलपणे विभाग पाडले जातात. हे विभाग कालवाचक आहेत, तितकेच ते गुणवाचक किंवा प्रवृत्तीवाचकही आहेत. यातून बदलत्या कालप्रवृत्तीइतकेच बदलत्या कलाप्रवाहांचेही सूचन होते.

प्राचीन म्हणजे इ. स. १८१८ ते १८७५ या कालखंडात संतकाव्य, शाहिरीकाव्य आणि पंडीतीकाव्य या तिन्ही परंपरा प्रचलित होत्या. संत व पंडितानी आध्यात्मिक विषयावर काव्यलेखन केले आहे. ज्ञानेश्वरांच्या पूर्वकालात महानुभावीय कवींनी देखील काव्य रचना केली आहे. संतकवितेनंतर शाहीरी काव्य आले. ज्यामध्ये मानवी भावनांचा उघड उघड आविष्कार झालेला दिसतो. प्रेमाची भावना स्वत:ची म्हणून त्यानी उघड केली. संतानी मात्र देवादिकांचेच प्रेम व्यक्त केले. इंग्रजी आणि इतर (हिंदी,उर्दू,अरबी) वाङ्मयाच्या वाचनामुळे मराठी कवितेचे स्वरुपही बदलत गेले. केशवसुतांनी बदलत्या स्वरुपाची कविता लिहिली . ते आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ओळखले गेले. आध्यात्माविषयाखेरीजच्या विविध मानवी भावभावना, निसर्ग, सामाजिक घटना, परंपरा, रुढी विषयक विचार या सर्वांनाच त्यांच्या कवितेत स्थान मिळाले. नंतरच्या काळात अनेकांनी अशा प्रकारची कविता लिहिली. रेंदाळकर व गोविंदाग्रज या केशवसुतांच्या शिष्यानी उत्तम कमगिरी केली. नव्या मन्वतराची आणि संघर्षाची सर्व वैशिष्टये केशवसुतांच्या कव्यात प्रवकटली. रेव्हरंड टिळक, विनायक, माधवानुज, कवी दत्त हे समकालीन कवी त्यांच्याच सारखी कविता लिहीत होते. आविष्काराच्या पध्दती सुक्ष्म स्वरुपात पण हळूहळू बदलतच असतात. प्रत्येक कवीची अनुभव घेण्याची आणि अनुभव अभिव्यक्त करण्याची पध्दती निराळी असते. बदल हे सुक्ष्मस्वरुपाने होत असतात. यमक अनुप्रासादी छंदाचे बंधन न घेता फक्त भावनेची अभिव्यक्ती महत्वाची मानणारी शब्दातील अंतर्गत लय सांभाळणारी मुक्तछंदात्मक कविता अवतरली. कवी अनिलांनी मुक्तछंदाचा हिरीरीने पुरस्कार करुन कविता लिहिली. त्यांचे अनुकरण करणाऱ्या अनेकांनी मुक्तछंद आपलासा केला आणि ही नवकविता जन्मली.

आधुनिक कविपंचकातले शेवटचे कवि गोंविदाग्रज १९१९ साली दिवंगत झाल्यावर काव्यपरंपरा तुटल्यासारखी वाटली. पण त्याच सुमारास रविकीरणमंडळ या नवीन कविमंडळाचा उगम झाला. माधव ज्युलियन, गिरीश आणि यशंवत हे त्यातले महत्वाचे कवी. त्यांच्याबरोबर वि. द. घाटे, द. ल. गोखले, ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. बा. रानडे हे चौघे होते. काव्यचर्चेसाठी, रसस्वादासाठी प्रत्येक रविवारी होणाऱ्या मैफीलीतून १९२३ साली रविकिरण मंडळ जन्मले. आधुनिक काव्याचा प्रसार करण्याचे अतिशय महत्वाचे कार्य या मंडळाने केले. हे कवी काव्यगायान करीत असत. रचनेची शुध्दता, गेयता आणि भावनेची उत्कटता यांचा अपूर्व संयोग या कवीच्या काव्यात असल्यामुळे आधुनिक काव्य लोकप्रिय झाले. माधवज्युलियनांच्या ठिकाणी विव्दत्व व कवीत्व यांचा अपूर्व संगम होता. त्यांनी मराठी काव्यात भर घातलीच शिवाय अनेक रचनात्मक प्रयोगही केले. गझल, सुनीत, रुबाया, खंडकाव्य लिहले. मोरपंती थाटाच्या खास ढंगाच्या आर्या लिहल्या. गिरीश हे रविकिरणमंडळाचे जेष्ठ सदस्य व आधरस्थंभ. त्यांचे काव्य म्हणजे स्वच्छंदवादी वृत्तीच्या काव्याचा संयमशील व शालीन विस्तार होय. सामाजिक विषयाची खंडकाव्ये लिहली.

रविकिरण मंडळाबाहेर ही अनेक कवी होते. भा. र. तांबे, चंद्रशेखर, सावरकर, माधव तिवारी, आज्ञातवासी, बेहरे, मायदेव इ. इ. चंद्रशेखरांचे समकालीन कवी भा. रा. तांबे यांची कविता गेयतेला प्राधान्य असलेली शुध्द तालातली आहे. त्याचा पहिला काव्यसंग्रह १९२० साली प्रसिध्द झाल्यामुळे त्याची ओळख रविकिरणमंडळाबरोबरच होऊ लागली. तांब्याच्या प्रेमगीताचे अधिष्ठाण त्यांची पत्नी आहे. त्यांनी प्रमाचे सोज्वळ, उदात्त, स्वरुप वर्णिले आहे. प्रेमातील शारीरिक आकर्षण सुध्दा किती प्रभीवी असते तेही व्यक्त केले आहे. 'रिकामे मंपुघट' 'जन पळभर म्हणतील हाय हाय' 'मरणात खरोखर जग जगते' अशी कितीतरी काव्ये तांब्याचे जीवनचिंतन व्यक्त करणारी आहेत. जगातील पार्थिव सुखाने वेडे झालेले त्यांचे मत प्रौढपणी शाश्वत सत्याचा शोध घेताना दिसते. १९३५ ते ४५ या दशकात अनिल, कुसुमाग्रज, बोरकर या कवीनी नव्या क्रांतीचा पाया घातला असे म्हणावे लागते. अनिलांनी मुक्त छंदाच्या प्रवर्तनाने व मानवतवादाने, कुसुमाग्रजांनी वस्तुनिष्ठ सामाजिक जाणीवांच्या प्रखर अविष्काराने व बोरकरांनी सुंदर प्रतिमा सृष्टीने कवितेची कोंडी फोडली. व नवतेची वाट दाखवली.

मराठी कवितेत या नवतेची चिन्हे मर्ढेकर पूर्व कालापासूनच दिसत होती, परंतु तिचा स्फोटक आविष्कार मर्ढेकरांच्या कवितेतून झाला.

मर्ढेकरांच्या "काही कविता" नी मराठी काव्येतिहासात पुन्हा एकदा केशवसुतांसारखे युगांतर घडवून आणले. वा.ना.देशपांडे, अनिल, पु.शि,रेगे, मनमोहन इत्यादींनी नवयुगाची काही पुर्वचिन्हे प्रकट केली असली तरी काव्याशय, काव्यभाषा आणि कवितेच्या स्वरुपासंबधीची जाणीव यात क्रांतीकारक परिवर्तन घडून आले ते मर्ढेकरांच्या कवितांमुळे, केशवसुती काव्यपरंपरा तोडणारे काव्य कालदृष्टया नवे तर होतेच, पण आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीनेही नवे होते. पूर्वीच्या कवितेत नसलेली अनेक वैशिष्टये या काव्यात होती. "नवकाव्य" शब्दाने गोंधळ होतो म्हणून "मॉडर्निस्ट" या अर्थाने त्याला नवकाव्य म्हणावे असे गं.बा. ग्रामोपाध्यानी सुचवले होते. तर भ.श्री. पंडीत हे "प्रचलित नवकविता" असे संबोधतात. त्याचे समर्थन करताना म्हणतात "प्रचलित नवकविता हा शब्दप्रयोग मी हेतुपुरस्सर करीत आहे. नवीन कविता अथवा अत्याधुनिक कविता हे शब्दप्रयोग मी करीत नाही कारण ते सापेक्ष आहेत. आज नवीन किंवा अत्याधुनिक वाटणारी कविता उद्या कदाचित जीर्ण अथवा पुरातन दिसण्याचा संभव आहे. तेंव्हा त्या दृष्टीने प्रचलित हा शब्दप्रयोग अन्वर्थक ठरेल"[१] पंडितांचे मत उचित होय.

नवपरंपरेतील या प्रचलित कवितेत कालच्या कवितेतील आत्मपरता कलाविकास स्वप्नाळूपणा व पलायनवाद यांचा अभाव आहे. ही कवी भावना व भाषा या दोन्ही दृष्टीनी प्रत्यक्ष जीवनाला कालच्या कवितेपेक्षा अधिक जवळची आहे. आजच्या युगातील या कवितेच्या बाहय व आंतर स्वरुपात म्हणजे विषय, विचार, भाषा व छंद यातच केवळ परिवर्तन घडले आहे असे नाही तर तिच्या महत्वमापनाच्या मूल्यमापनातही परिवर्तन घडून येण्यास नेहमीप्रमाणे परिस्थितीच कारण झाली आहे. या काळात देशात आणि देशाबाहेर अनेक महत्वाच्या घडामोडी झाल्या या देशातील लोकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा मोठाच परिणाम झाला आहे. युध्दजन्य परिस्थिती, महागाई व टंचाई, बेचाळीसची राष्ट्रसभेची "चलेजाव"ची चळवळ, जपानची चढाई, बाबू सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना व तिचा पराक्रम, लॉर्ड वेव्हेल यांच्या राष्ट्रीय नेत्यांशी वाटाघाटी, लॉर्ड माऊंटबॅटन यांची यशस्वी कामगिरी, हिंदूस्थानची फाळणी, पंजाब व बंगाल येथील हत्याकांडे व नारी अपहरणे, निर्वासितांचा प्रश्न इत्यादी एका मागुन एक घडलेल्या घटना परिणामाच्या दृष्टीने फार महत्वाच्या आहेत. १९१४ च्या पहिल्या

महायुध्दात प्रत्यक्ष आंच बसली नव्हती, युध्द फक्त पश्चिमेसच होते. परंतु १९३९ च्या दुसऱ्या महायुध्दात जपान ब्रह्मदेश, सिंगापूर हे पूर्वे कडील भाग गोवले गेल्यामुळे हिंदुस्थानास होरपळून निघावे लागले, त्यामुळेच उध्वस्त जीवन विस्कळीत परिस्थिती व निराशापूर्ण भविष्य या गोष्टी प्रचलित नवकवितेत प्रामुख्याने उमटत आहेत. दिवसेंदिवस आंतरराष्ट्रीय संपर्क वाढत असल्यामुळे अन्य राष्ट्रातील विचारसरणीही अभ्यस्त व नागर नवकवींवर आपली छाप पाडीत आहे. रशियातील मार्क्सवादी विचारसारणीची बरीच गडद छाया नवकवितेवर पडली आहे. या परिस्थितीचा प्रेरणा म्हणून नवकवितेला उपयोग झाला. तसेच केशवसुतांप्रमाणेच मर्ढेकरांनाही पाश्चात्य कवी एझरा पौंड, टी.स.एलियट, ऑडेन, स्पेंडर यांच्याकडून नवकाव्याची प्रेरणा मिळाली. 'नवकाव्य' म्हणजे पाश्चात्य काव्याचा नुसता प्रतिध्वनी किंवा आंधळे अनुकरण असेल तर एका कवीच्या केवळ कवितांनी युगपरिवर्तन घडत नसते. पाश्चात्य काव्याने एक वेगळी काव्यदृष्टी दिली. त्याचवेळी मराठी कवितेतील सांकेतिकता, भावुकता, कृत्रिमता यांचेही दिवस भरत आलेले होते. कवी, वास्तव आणि कविता यांच्या परस्पर सापेक्षतेतून काव्यप्रवाहाची नवी दिशा ठरत असते. कवितेचे खरे स्वरुप सिध्द होण्यासाठी अशी क्रांती अपरिहार्य असते. वास्तव सर्वांनाच जाणवते असे नाही आणि जाणवते त्यांनाही सारखेच जाणवते असे नाही. जाणीव मात्र जीवनानुभवातूनच मिळते. नवकाव्याच्या आशयाला आणखी एक परिणाम लाभले आहे, ते म्हणजे मानसशास्त्रीय उपपत्तीचे फ्राईडने मनोविश्लेषणाव्दारा अचेतन व उपचेतन मनांची अंधारी गुहा उघडून दिली, अंतर्मनाचे पापुद्रे उलगडले, नवकाव्याने या अंतरंगाचे, त्यातील विरुपाचे व अदभूताचे रम्य व भीषण दर्शन घेण्याचा प्रयत्न केला.

वरील सर्व सामाजिक परिस्थितीमुळे आणि पाश्चात्य प्रेरणेमुळे नवकाव्यातील वैशिष्टयामध्ये आधीच्या पिढीच्या काव्यातील वैशिष्टयापेक्षा वेगळी वैशिष्टये जाणवू लागली त्यामुळे समीक्षकांमध्ये अनेक वाद-प्रत्यावाद झाले. कविता दुर्बोधता, अश्लिलता, गद्यप्रायता यांनी भरली आहे असे अनेक आरोप झाले. अशी नवकविता नक्की होती तर कशी? त्याची नेमकी वैशिष्टये कोणती? या कवितेची भाषा पुष्कळ प्रमाणात गद्यात्मक आहे आणि तिला छंदाचे बंध व प्रासांचे पाश याचे वावडे आहे. तसेच समाजवादी सिध्दांताचा प्रचार तिच्यात दृष्टीस पडतो. अगोदर केशवसुत, माधवानुज, तांबे यासारख्या कवींनी समाजवादी विचार मांडले होते. परंतु त्यांच्या विचारात विवेक व विचार येतात. पंडितांच्या मते, "परंपरेतील कवींच्या काव्यात प्रक्षोभाचे प्रखर अंगार भडकले आहेत. समाजातील शोषित व पिडित यांच्या संबधी सांद्र सहानुभूति व्यक्त करीत असताना अलिकडील लेखक सत्ताधिकाऱ्यावर तुटून पडलेले



...KAR LIBRARY
...IVAJI ... KOLHAPUR

दिसतात."[२] तसेच आणखी एक वैशिष्टय म्हणजे कवितेतील लिंगवाद, संज्ञाप्रवाह याबरोबरच त्यांनी आंतर राष्ट्रीयता व मानवता हा जनकवितेतील एक प्रवाह हा अगदी 'हे विश्वची माझे घर', 'जो जे वाछिल तो ते लाहो - प्राणिजात', 'कोणत्याही जीवाचा न घडो मत्सर' हे आपल्याला प्राचीन काळापासून माहित असले तरी सद्यकालीन मानवता ही परस्परांसंबधी नड, गरज, भीती यातून निर्माण झाली आहे. पूर्व कालीन मानवता निर्मळ व प्रांजळ मनाच्या उच्च भूमिकेवरील कोमलतेतून उत्क्रांत झाली होती. कालच्या मानवतेचे भक्त हे संत व महंत होते. त्यांची परम पवित्र चरित्रे पुढील पिढयास मार्गदर्शक झाली आहेत. आजच्या मानवतेचे पुजारी हे खरोखरच त्या पातळीवरचे आहेत का? हा एक विचारणीय प्रश्न आहे"[३] अशा प्रकारे नवकाव्यात आशय, प्रतिमा, शब्द, रचना, शैली इत्यादी सर्व घटकांच्या संकल्पना बदलुन गेल्या. त्यामुळेच नवकाव्यात अटळपणे दुर्बोधता आली व तेच तिचे विशिष्ट लक्षण समजले गेले. कवितेचे क्षितिज विस्तारले गेले. साठ पर्यंत नवकव्यांची दोन प्रर्वतने घडून आली व नवकाव्याला स्थैर्य प्राप्त झाले. अनेक समिक्षकाना नरकाव्य रुक्ष व शुष्क वाटते. अपरिचित प्रतिमामुळे ते दुर्बोध वाटते. भाषा धेडगुजरी किंवा बोजड वाटते.

नवकाव्याची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विस्तारभयास्तव प्रातिनिधिक स्वरुपात फक्त सहा नामवंत नवकवींच्या काव्याचा आढावा थोडक्यात घेत आहोत.

## प्रचलित नवकवी -

## बाळ सिताराम मर्ढेकर -

शिशिरागम (१९३९) काही कविता (१९४७) आणखी काही कविता (१९५१) या संग्रहातून मर्ढेकरांच्या सर्व कविता संग्रहित झाल्या आहेत. त्या पुढे 'मर्ढेकरांची कविता' यामध्ये एकत्रित केलेल्या आहेत.

मर्ढेकरांना केशवसुताप्रमाणेच एक युग घडविणारे कवी म्हटले जाते. त्यांनी कवितेत प्रतिमा नावीन्य आणले. आविष्कारणाची पूर्वपरंपरा मोडून काढली स्वत:ची निश्चित अशी आगळी वेगळी शैली निर्माण केली आणि त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे काव्याच्या प्रांतात आस्वादक वाचकाला पूर्णपणे अपरिचित असलेली कल्पनाचित्रे निर्माण करुन वाचकाची बुध्दी आणि आस्वादनक्षमता कसोटीस लावली. यंत्रयुगामुळे व दुसऱ्या महायुध्दामुळे बदलू लागलेले

समाजसंदर्भ मर्ढेकरांनी आपल्या कवितेतून जगापुढे ठेवले. त्यामुळे साहजिकच प्रखर वास्तववादी भुमिकेतून त्यांची कविता निर्माण झाली. त्यांच्या जवळजवळ प्रत्येक कवितेवर या सामाजिक बदलाचा प्रभाव जाणवत राहतो. काव्यविषयापासून ते रचनेपर्यंत आणि प्रतिमांच्या वापरापासून ते अर्थ प्रतितीपर्यंत एक अनोखे विश्व मर्ढेकरांच्या काव्याच्या रुपाने निर्माण झाले.

मर्ढेकरांच्या कवितेचे जाणवणारे सर्वात महत्वाचे वैशिष्टय म्हणजे ती इतर कुणाही समकालीन कविपेक्षा अधिक व्यक्तिनिष्ठ आहे. तिच्यात 'स्व' चे भान अधिक आहे. अत्यंतिक आत्मनिष्ठतेमुळे स्वयंकेंद्रित भावना व्यक्त करण्यातच ती धन्यता मानते. आत्मगुंजनासारखे तिचे रुप असल्यामुळे ती दुर्बोधतेकडे अधिक झुकलेली आहे. मर्ढेकरांची सौंदर्यपिपासू वृत्ती सतत सजग असते. जीवनामधील विविध चित्रे रेखाटताना रुप, रस, गंधादी सर्व संवेदना एकवटून कविता निर्माण होते. तरल संवेदनांचा आविष्कार त्यांच्या कवितेत हळुवारपणे होताना दिसतो. जसे -

"ओल्या पानातल्या रेषा
वाचतात ओले पक्षी
आणि पोपटी रंगांची
रान दाखविते नक्षी"[४]

या ओळीतील निसर्गचित्र बालकवींची आठवण करुन देणारे आहे. पक्षी वाचतात पोपटी रंगाची नक्षी हे शब्दप्रयोग समृध्दीसूचक व सुखलोलुप वृत्ती दाखविणारे आहेत.

## नवनवोन्मेष शालिनी प्रज्ञा

मर्ढेकरांची प्रतिभशक्ती या प्रकारची होती. नवनवीन हृद्य उपमा-उत्प्रेक्षांचा वापर मर्ढेकर लीलया करतात. अर्थाचे नवनवे उन्मेष व्यक्त करण्यात त्यांची प्रतिभा कुशल आहे.

"न्हालेल्या जणु गर्भवतीच्या
सोज्वळ मोहकतेने बंदर
मुंबापुरिचे उजळित येई
माघामधली प्रभात सुंदर
सचेतनांचा हुरुप शीतल
अचेतनाचा वास कोवळा
हवेत जाती मिसळुनि दोन्ही
पितात सार गोड हिवाळा"[५]

हे नयनरम्य वर्णन एखादया भावकवितेप्रमाणे विविध संवेदनांना आवाहन करणारे आहे. न्हालेली गर्भवती व तिची सोज्वळ मोहकता या शब्दप्रयोगांनी उभी केलेली प्रतिमा दृकसंवेदना तृप्त करणारी आहे. या ओळीमध्ये मर्ढेकरी शैलीचे काही विशेषही पाहण्यासारखे आहेत. शीतल हूरुप, कोवळा वास, गोड हिवाळा पितात. या शब्दप्रयोगांनी थोडे बुचकळयात पडल्यासारखे वाटते. ही रुपकात्मक रचना अविषयाशी विषय जोडणारी आहे. अशी रूपके पूर्णत्वाने येत नसून ती खंडीत रुपकाप्रमाणे येतात. त्यामुळे वाच्यार्थबोधासह व्यंगार्थाच्या अनेक छटा मनात येत राहतात. ही अर्थकता किंवा दुर्बोधता एखाद्या अंलकारापमाणे मर्ढेकरांच्या कवितेत सतत येत राहते.

कधीकधी अभिव्यक्तीला विक्षिप्तपणाचा स्पर्शही झाल्यासारखा वाटतो.

"देवावरचा शाप देऊळी
हपीसात अन ताप उद्याचा
चिमणी मिनिटे उटून जाती
फक्त हुंगूनी दाणा मनिचा"[६]

अशा ओळी वाचकाला अर्थ शोधताना विलक्षण ताण देत राहतात. अगळया वाटणाऱ्या प्रतिमा आणि विक्षिप्तपणा यांचे सुंदर मिश्रण मर्ढेकरांच्या कवितेत दिसते.

## प्रतिमांचा वापर

मर्ढेकरांच्या कवितेत उपमा, उत्प्रेक्षा, रूपक या सारखे अर्थालंकार पुन:पन्हा येत राहतात. पण त्यांचे खरे सामर्थ्य त्यांच्या प्रतिमाविश्वातच आहे.

"अंधाऱ्या जगाची
हीच रीत भात
काजळाची वात
काळोखाला"[७]

यातील काळोखाला काजळाची वात ही रुपक प्रतिमा अर्थाचे विविध पदर उलगडणारी आहे.

मर्ढेकरांच्या निसर्गप्रतिमाही अर्थगर्भ आहेत.

"अजून येतो वास फूलांना
अजूनही माती लाल चमकते
खुरटया बुंध्यावरती चढून
अजून बकरी पाला खाते"[८]

यातील निसर्गप्रतिमा ऐन्द्रिय अनुभव देणारी आहेच, शिवाय मर्ढेकरांची सुखासीन वृत्ती सुचित करते. बकरी ही जर कवीचीच प्रतिभा मानली तर रसिक आशावादी कवीचे हे मनोगत वाटते. अशीच सौंदर्यलोलुप वृत्ती पुढील ओळीतून व्यक्त झाली आहे.

"खुल्या चांदण्याची ओढ
आहे माझी ही जुनीच
आणि वाहत्या पाण्याची
शीळ ओळखीची तीच"[९]

निसर्गातील चांदणे आणि पाणी यांच्याशी असलेले दृढ नाते कवीमन अजूनही धरुन आहे.

रसपरिपोष साधताना मर्ढेकरांच्या प्रतिभेला वेगळे परिमाण लाभते.

"झोपली ग खुळी बाळे
झोप अंगाई आली
जड झाली शांततेची
पापणी ह्या रित्या वेळी"[१०]

बोरकरांची आठवण करुन देणाऱ्या ओळी असून अंगाई, बाळे या शब्दांनी वात्सल्य सूचित झाले आहे. 'शांततेची पापणी ' ही वेगळी प्रतिमा वापरली आहे.

मर्ढेकराच्या कवितामधून काही आदिबंधात्मक प्रतिमाही आढळतात.

"दवात आलिस भल्या पहाटे
शुक्राच्या तोऱ्यात एकदा
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरल पावलांमधील शोभा"[११]

या ओळीतील स्त्रीची प्रतिमा म्हणजे मर्ढेकरांच्यो मनातील अनामिक असे आदिम स्त्रीरूप होय. त्याप्रमाणे

"पोरसवदा होतीस
कालपरवा पावेतो
थांब उदयाचे माऊली

तीर्थ पायाचे घेईतो"[१२]

येथे प्रथमच माता होणाऱ्या मुलीला कवी देवत्व देतो. मातृत्वाचे पूजन करणे हा आदिम संस्कार आहे, तोच तेथे व्यक्त झाला आहे असे वाटते.

मर्ढेकरांच्या कवितेत आस्तित्ववादाचे दर्शन वास्तववादाच्या जोडीनेच घडते. हा एक प्रकारच्या युगांतराचे द्योतक असणारा संकर आहे. त्यामुळे त्यांच्या प्रतिमासृष्टीतही नाविन्य आले आहे. समकालीन कवीपेक्षा वेगळे आदिबंधचे रुप मर्ढेकरांच्या काव्यात दिसते.

"एकला असून । मनी दोन झालो,
आता मात्र भ्यालो । मला मीच

कवीला येथे आपले दुभंगलेले रुप दिसते आणि त्याच्या ठिकाणचा 'विदुषक' प्रकट होतो. तो पुढे सांगतो -

"चिंतेवीण चिंता । आशेवीण आशा
साद्यंत तमाशा । रंगवोन ।।
येईल पडदा । हळूहळू खाली
विदुषका वाली । हास्यरस ।।"[१३]

जीवनाची अर्थहीनता आणि मुल्यहीनता दाखविताना मर्ढेकरांनी त्याची जाणीव विदुषक वृत्तीनेच दाखवली आहे. आश्चर्य म्हणजे जीवनातली विसंगती, निराशा, वैफल्य सांगत असताना मर्ढेकरांनी संताच्या पावलावर पाऊल ठेवून ओवी अभंगासारख्या छंदाचा आधार घेतला आहे.

## सामाजिक मुल्याचे चित्रण

मर्ढेकरांच्या काव्यात संवाद-विसंवाद मानसिक साहचर्य, वृत्तीना आवाहन सतत आढळते. सहजव्यंजन प्रतिमांच्या आधारे त्यांनी अनुभूतींचे चित्रण केलेले आहे. त्यांच्या प्रतिमाविश्वात कधकधी असहायपणा दिसतो. प्रचलित सामाजिक मूल्यांपेक्षा त्यांची मूल्ये निराळी असतात. त्यामुळे त्यांच्या कवीवृत्तीला एक प्रकारची उपरोधाची धारही येते. कधी कधी आगतिकताही व्यक्त होते. जसे -

"अशा येथल्या संसारात
जगण्याचाही चुकला पाढा

आणि शेवटी परिस्थितीचा
गळ्याखालती उतरे काढा"[१४]

मर्ढेकरांची निराशा ही अशा प्रकारची आहे, त्यांच्या काव्यात विफलता आहे. पण त्या पाठीमागचे कारण जाणताना या यंत्रयुगात विशेषतः दुसऱ्या महायुध्दानंतर मानवतेची जी दारूण व निर्दय विटंबना झाली ती पाहून कोणत्याही सत्प्रवृत्त, भावनाशील व प्रामाणिक माणसाला उद्वेग व संताप येणे अगदी स्वाभाविक आहे असे वाटते. मर्ढेकरांची अशीच अवस्था झाली आहे. यंत्रयुगामुळे सामान्य माणसाच्या जीवनात आलेली कृत्रिमता मर्ढेकर दाखवतात. त्याचप्रमाणे "जगण्याची पण सक्ती आहे। मरण्याची पण सक्ती आहे" अशी अगतीकता पण सांगतात. सामान्यांच्या जगण्यातली निराशा, भकासपणा, त्रुटीता, विसंगती, विषमता, अर्थशून्यता, भयानकता हे सर्व कवीला तीव्रपणे जाणवते आणि मनाला छळते. त्यावर कवी चिंतन करतो. म्हणूनच मर्ढेकरांची कविता शाश्वत प्रश्नचिंतनाची कविता आहे.

## चिंतनशीलता

मर्ढेकरांच्या दृष्टिला यंत्रयुग आणि आर्थिक विषमता यामुळे निर्माण झालेली विफलता आणि रुक्षता सभोवतालच्या जीवनात तीव्रतेने जाणवलेली आहे आणि तीच त्यांनी आपल्या कवितेतून कधी उपहासाने तर कधी विडंबन करून तर कधी निर्भय फटकळपणाने व्यक्त केलेली आहे. या संदर्भात "उसन्या अवसानाचा क्लच दाबून खोटया उत्साहाची गाणी लिहिण्याच्या दांभिकतेपासून हा कवी आनरण अलिप्त राहिला आहे"१५ असे भ.श्री. पंडित म्हणतात. मर्ढेकरांनी कृत्रीम खोटे कांहीही लिहले नाही. जे जाणवले ते प्रमाणिकपणे तसेच्या तसे व्यक्त केले. ते त्यांच्या काळाचे नवे कवी होते. त्यांच्या कृतीचे साधर्म्य दाखविताना गो.वि.करंदीकर म्हणतात, "जीवनविषयक चिंतनात इतका सर्वतोपरी गढलेला, त्यातील अनाकलनीय गुढांनी स्तिमित झालेला, त्यातील आंतर्विरोधांनी व अगतिकतेने व्याकुळ झालेला आणि अंतिम मुल्यदर्शनाच्या दृष्टीने मानवी चिंतनाची विफलता कळल्यावरही पुन्हापुन्हा अपरिहार्यपणे त्यांच्या आहारी जाणारा मर्ढेकरांच्या कसाचा चिंतनात्मक काव्यपिंड मराठी काव्यामध्ये ज्ञानेश्वरांच्या शिवाय अन्यत्र सापडणार नाही "[१६] वैफल्याने व अर्थशून्यतेने भयाण, बीभत्स अनुभव देणारे मर्ढेकर श्रध्दाशून्य होत नाहीत. त्यांची श्रध्दा धार्मिक व भावूक नाही हे खरे; पण त्यांच्या जीवन दृष्टीत व्यक्त झालेली सात्विक उदात्तता संतवाणीचे स्मरण करुन

देण्याइतकी पावन स्वरुपाची आहे "[१७] असे अ. ना. देशपांडे यांनी म्हटले आहे. दोन्ही समीक्षकांनी गैरवलेली मर्ढेकरांच्या कवितेतील चिंतनशीलता खरोखरीच श्रेष्ठ दर्जाची आहे.

मर्ढेकर प्रयोगशील होते. त्यांनी मराठी कवितेची परिभाषा बदलून आपल्या प्रयोगातून कवितेतील क्षमतेची नवी दालने पुढीलांना खुली करुन दिली. इंग्रजी शब्दांचा व लकबींचा मार्मिक वापर करुनही कवितेचे मराठीपण कायम ठेवले. त्यात नवतेची संजीवनी ओतली हे विशेष होय म्हणूनच "संपूर्ण मराठी कवीपरंपरेमध्ये मर्ढेकरांच्या तोडीचे कलात्मक साहस सापडणार नाही " असे उद्‌गार करंदीकरांनी काढले आहेत. त्यांनी आपली अभिव्यक्ती मिताक्षरी बनवली. अन्वर्थक विशेषणे वापरली. "पंक्चरली जरी रात्र दिव्यानी । तरी पंपतो कुणि काळोख " सारखी वेगळी पण समर्पक भाषा तसेच विषम रूपके, नव्या विज्ञान युगातली उपमाने आणली. या सर्व क्लृप्त्यांमधुन प्रतिमांची नवी सृष्टी रचली. संज्ञाप्रवाहाचा पाट आणून सोडला. मर्ढेकरांनी नवकवितेचे मुख्य वैशिष्टय असणाऱ्या "मुक्तछंदाचा वापर न करता ओवी, अभंग, पादाकुलक यासारख्या छंदातून नवकाव्याच्या प्रवर्तकाने आपली कविता लिहिली "[१८] तसेच "बदकाचे गुपित" सारख्या संगितिकाही त्यांनी प्रथम लिहिल्या. त्यांची ही प्रयोगशीलता बघून गंगाधर गाडगीळांनी त्यांना 'दुसरे केशवसुत' असे संबोधले आहे. त्यांच्या काव्यभाषेचे वर्णन करताना रा. श्री. जोग म्हणतात, "आविष्कारातील फटिंगपणा आशयातील विव्देषाला अनुरुप असाच त्यांच्या कवितेमध्ये उतरला आहे."[१९] मर्ढेकरांनी आपला आशय नेमक्या शब्दात, टामपणे ,स्पष्टपणे मांडला आहे.त्याचा आशय काव्यभाषेतून वेगळा काढता येत नाही.

मर्ढेकर समकालीन मराठी काव्याविषयी अतिशय असंतुष्ट होते. या असंतुष्टतेची कारणे व आपली काव्यभूमिका त्यांनी "वाङमयीन महात्मता" च्या तीन लेखातून मांडली. याबरोबरच सौंदर्यशास्त्रावर स्वतंत्रपणे लेखन करून समीक्षा क्षेत्रात मोलाची भर घातली आहे.

## शरच्चंद्र मुक्तिबोध

'नवी मळवाट' (१९४९) व 'यांत्रिक' (१९६४) हे दोन मुक्तबोधांचे काव्यसंग्रह आहेत. केशवसुतांपासून सामाजिक जाणीव हा काव्याचा विषय असला तरी मुक्तिबोधांची जाणीव वेगळी असून प्रारंभी त्यांच्यावर कवी अनिलांचा प्रभाव असल्याचे जाणवते. परंतु "अनिलांच्या काव्याचा मुक्तीबोधांवर आरंभी प्रभाव दिसून आला. त्यामुळे त्यांना अनिलांचे

सांप्रदायिक म्हटले गेले, पण मुक्तिबोधांची सामाजिक जाणीव सर्वांपेक्षा वेगळी होती. ती विरोधविकासाधिष्ठित मार्क्सवादी सिध्दांताची प्रतिबध्दता खुलेपणाने मानणारी होती."[२०] असे मत निशिकांत ठकार यांनी व्यक्त केलेले आहे. कारण मानवतेच्या कळवळ्याबरोबर त्यांच्या कवितेत त्याबद्दलची उत्तम दाहकता दिसून येते. त्यांच्या कवितेत मर्ढेकरांप्रमाणे जीवनातील विफलतेच्या अंधाराचे चित्रण असले तरी या विफलतेवर व मानवतेला मारक ठरणाऱ्या गोष्टींवर मात करुन भविष्यकाळाबद्दलचा आशावादी सूर हे त्यांच्या कवितेचे महत्वाचे वैशिष्टय आहे. म्हणूनच अ.ना.देशपांडे म्हणतात. "पराकोटीची परिस्थिती आणि तिच्या निर्दय आघाताना न जुमानताही वर उत्साहाने उफाळून येणारी जीवनशक्ती हे दृश्य मुक्तिबोधांच्या प्रमुख कवितांचे स्फुर्तिकेंद्र राहिलेले आहे"[२१] मुक्तिबोधांनी आपल्या अनेक कवितांतून फँटसीचे उपयोजन केले आहे. असे हे नवकवितेची सामर्थ्ये समजून घेऊन पण त्या धारेशी एकरुप न होता स्वतंत्र वळणाने साम्यवादी जाणीवेने काव्य करणारे मुक्तीबोध हे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्वाचे कवी होत.

## पु.शि. रेगे

नवकवींशी जवळीक असणारे व सौंदर्यवादी कवींमध्ये स्वतंत्र स्थान निर्माण करणारे कवी म्हणून पु.शि. रेगे यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांच्या कवितेत विलक्षण आत्मनिष्ठता आहे. किंबहुना स्वत:ला केंद्रस्थानी कल्पूनच ते कवितेला व तिच्या घटकांना स्वत:भोवती पिंगा घालायला लावतात. त्यांची सौंदर्यदृष्टी अतिशय मुक्तपणे अनुभूती गोळा करते. नवकाव्याच्या अभिजात, सौंदर्यलक्षी शुध्द कवितेचे निर्माते आणि पुरस्कर्ते म्हणून रेगेंचे नाव घ्यावे लागते. समकालीन इतर कोणाही कवीपेक्षा शृंगाररसाशी सर्वाधिक तादात्म्य पावणारे कवी म्हणून रेगे यांचा उल्लेख करावा लागेल. 'स्त्री सौदर्य' हा त्यांचा अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. मात्र स्त्री मनाच्या सौंदर्यापेक्षा स्त्रीदेहाशी त्यांची लगट अधिक आहे असे वाटते. शृंगाररस आणि स्त्री यांची विविध रम्यचित्रे कालिदासादि संस्कृत कवींनी रंगविलेली आहेत. रेगे तेवढयाच समर्थपणे मराठीत अशी स्त्री चित्रे रंगविण्यात स्वत:ला धन्यता मानतात, स्त्रीचे स्त्रीत्व पुरुषाच्या नजरेतून साजरे करतात. इतर निसर्गकवी निसर्गप्रतिमांमध्ये मानवीभाव शोधत राहतात. मात्र रेगे मानवी प्रतिमांमध्ये निसर्ग सौंदर्य शोधण्याचा प्रयत्न करतात. स्त्री-देह आणि निसर्ग यांच्यातील

ऐक्य अतिशय तरल व संवेदनाक्षम रीतीने रेगे यांनी दाखविले आहे. त्यांची कविता शुध्द कलावादी संवेदन जाणीव व्यक्त करणारी आहे.

पु.शि.रेगे यांनी 'सुहदचंपा' या टोपण नावाने काव्यलेखन सुरु केले आणि 'साधना आणि इतर कविता' हा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित केला. नंतरच्या फुलोरा (१९३७), हिमसेक (१९४३) दोला, रंघरेख, पुष्कका, दुसरा पक्षी, प्रियाक अशा पुढील संग्रहात आपले हे टोपण नाव त्यांनी सोडून दिले. त्यांच्या काव्यात अर्थप्रतितीच्या दृष्टीने गुढता व दुर्बोधता असून त्यांनी स्वत:ची स्वतंत्र काव्यभाषा निर्माण केली आहे. मिताक्षरी असून संस्कृतप्रचूर खानदानी वळणाची आहे. स्त्रीदेहाचे वर्णन हे त्यांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्टय आहे. त्यामुळे त्यांच्यावर अनेक प्रकारे टीकाही झाल्या आहेत. परंतु निशिकांत ठकार यांच्या मते "स्त्री शरीर हे त्यांच्या काव्यानुभूतीचे संमोहन आहे. मूलत: सृजनशक्तीचेच ते रुप आहे. त्यांच्या मते कवितेचे दोनच विषय संभवतात 'सृजन आणि मरण सृजानाच्या' पार्थिवतेचे रुपरसरंगगंधमय सवेद त्यांच्या काव्यलावण्यात लसलसते"[२२] तर अ.ना. देशपांडे म्हणतात, "उत्तान प्रणयाची सूचना करणाऱ्या रेग्यांच्या या कविता वाचल्या म्हणजे लावणी वाङमयाचे आणि त्याच्याही आधीच्या 'गाथासप्तशती' चे स्मरण होणे अपरिहार्य आहे. यांत गौरविण्यासारखे नावीन्य व अपूर्वत्व नसतानासुध्दा नवकाव्यात आपल्या कवितेने एक स्वतंत्रच प्रवाह निर्माण केला आहे. अशी त्यांची शेखी आहे "[२३] अशी ही रेग्यांची कविता रविकिरण मंडळाच्या रुळलेल्या वाटेने न जाणारी किंवा मर्ढेकरी नवकवितेचा माग न धरता स्वत:चा स्वतंत्र पिंड जोपासणारी आहे. रेगे शब्दाची मोडतोड न करता त्यांना नखरेलपणाने मुरड घालून, नवा संदर्भ देऊन वेगळाच अर्थ देतात. बंदिशीचेही अनेक प्रयोग त्यानी केले आहेत. भाषिक व्यवहारातून सहज स्फुरणारे छंद त्यानी वापले आहेत.

रेग्यांच्या कवितेतील शृंगार रसिकजन्य व चित्रदर्शी वाटला तरी तो शरीर पातळीवरील आहे. त्यांनी अत्यंत नि:संकोचपणे व निर्भय पणे शृंगार व्यक्त केला आहे. मात्र शृंगारचित्रे रंगविताना केवळ बाहयाकार किंवा स्थूलावयव यांच्यावर भर न देता रेगे सुक्ष्मतेने त्यातील भावछटा दाखवितात. वरकरणी मुख्यार्थाला आवाहक वाटणारी रेग्यांची प्रतिभा व्यंगर्थाचे विविध पदर उलगडून दाखविते. त्यांची व्यंजकताच त्यांच्या कवितेच्या सौंदर्याचे गमक आहे. किंवा व्यवछेदक लक्षण आहे. केवळ स्त्रीदेहाशी निगडीत जीवनानुभव रेग्यांच्या कवितेतून

व्यक्त होत आसल्यामुळे त्यांच्या अविष्काराला मर्यादा पडतात, असे जरी वाटले तरी प्रत्यक्षात कवितांचा आस्वाद घेताना त्या अनुभवांचे असंख्य रंग दृष्टीस पडतात. मुक्तछंदाचा वापर वेगळया पध्दतीने व समर्थपणे करण्यातही रेग्यांचे कौशल्य आहे. शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श अशा विविध संवेदनांना तृप्त करयाचे सामर्थ्य रेग्यांच्या अभिव्यक्तीत आहे. त्यांचे अनुभवाचे विश्व शृंगारानिष्ठतेमुळे एककेंद्री बनले आहे.

"सतेज तुझे बोलणे चालणे
सुकुमार खेळ अंगी नव्हाळी
अपूर्व जणू हिमसेक हा क्षणभर वाटे
स्वच्छ, निरागस, तेजाळ विश्रब्ध"[२४]

तरुणीचे हे वर्णन आहे हे उघड आहे. रेग्यांच्या प्रतिमाविश्वात तरुण स्त्रीनेच अधिक जागा व्यापलेली आहे. शृंगारलोलूप कवी एका बाजूला उभा राहून दुसऱ्या टोकावर उभ्या असलेल्या सुंदरीला न्याहाळतो आहे. पुरुष व स्त्री या दोन धृवांमधील हा व्दंव्दमूल अनुभव आहे. रेग्यांच्या बहूधा सर्वच कवितांमध्ये ही व्दिधृवात्मकता नजरेस पडते. 'हिमसेक' कवितेतील प्रियेलाच कवीने हिमसेक बनवून टाकले आहे. हिमसेक ही प्रतिमा रूप-स्पर्श अशा संवेदनांना तृप्त करणारी आहे. स्त्री स्पर्शाची व स्त्री रुपाची मोहिनी घालणारी आहे. स्त्रीचे हे मनोज़ रूप आहे.

## संस्कृतप्रचुर शब्दरचना

रेगे यांच्या अल्पाक्षरी कवितेला संस्कृत शब्दांचे वेड आहे. कल्पनेच्या उत्तुंग भराऱ्या त्यांना मानवत नाहीत. त्यापेक्षा संचत शब्दरचना त्यांना हवीशी वाटते.

"रंग इथे नवतीचे व
हिनकळती, होति पुन्हा
अवतीचे-भवतीचे
चंद्र सखा मनवाणा
खोवितसे तोहि पुन्हा
पालवत्या चैत्र-खूणा "[२५]

नवतीच्या रंगानी व्यापलेली सृष्टी आणि चंद्रासारखा प्रियकर प्रेमानुकुल वातावरण निर्मिती करीत आहे. सखा, मनवाणा असे शब्दही रेग्यांनी कसे अचूक वापरेले आहेत.

रेगे यांच्या अनेक कवितांमधून स्त्री-सहवासाची ओढ, स्पष्ट शब्दातून व्यक्त झाली आहे. जसे - प्रियकर आपल्या प्रियासीला म्हणतो आहे -

"लंपट ओले वस्त्र होऊनी
अंग अंग तव लिंपून घ्यावे
हुळहुळणारे वस्त्र रेशमी
होऊन वरवर घोटाळावे"[२६]

स्वत: ओले वस्त्र, रेशमी वस्त्र होण्याची इच्छा, तसेच लिंपून घ्यावे, घोटळावे हे शब्द यातून प्रियकराच्या भवनेची उत्कटता अधिक तिव्रतेने जाणवते. शृंगारिकता वाटते.

"पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन
पुष्कळातली पुष्कळ तू, पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठी "[२७]

येथे पुष्कळ शब्द स्त्री प्रतिमा संबंध्द आहे. पुष्कळ हे बहुवचनी विशेषण असूनही प्रेयसीला पुन्हा पुन्हा उद्देशून जोडले आहे. या शब्दाने तिची शरीर-प्रतिमा सावयव दृकस्वरूपात अनुभवास येऊ लागते. तिचं अगवैभव कवीच्या मनाला पूर्णपणे व्यापून टाकीत आहे. अशाप्रकारे रेगे कल्पकतेने कवितेला ऐन्द्रिय अनुभवाच्या पातळीवर आणतात.

रेग्यांच्या कवितेचे आणखी एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांच्या स्त्री-वाचक सर्व कवितांमधून 'अनिमा' या आदिबंधाचे दर्शन घडते.किंबहुना स्त्री-प्रतिमा हा अदिबंध रेग्यांच्या कवितांचा आधार आहे असेच म्हणावे लागते. उर्वशी, मस्तानी, शहनाज इत्यादी अनेक कवितांमधून आदिमातेचा आदिबंध डोकावतो. रेग्यांच्या कविसृष्टीमध्ये स्त्रीचे सतत होणारे दर्शन हा त्या आदिबंधाचाच परिपाक आहे असे म्हणावे लागेल.

"ओठावरचे हासू कातिल
सहजहि गेले छेदून हे दिल
खुशाल सांडिसि त्यावर आणि
डोळ्यांमधले नमकिन पाणी
कोण कोठली बेपर्वा तू ?
कोण कोठली चेटकीन तू ?" [२८]

येथे कवीने बेपर्वा चेटकिणी प्रमाणे वाटणाऱ्या प्रेयसीच्या ठिकाणी आदिमातेचाच अनुभव घेतला आहे. ती त्याला वास्तवातील सर्वसामान्य स्त्री-प्रमाणेच वाटते. सामुहिक अचेतनाच्या किंवा नेणिवेच्या स्तरावर असा आदिस्त्रीचा आदिबंध कवीच्या

अनुभवविश्वावर कवितेच्या व्दारा प्रकट होत असतो. 'शहनाज' कवितेतील स्त्री प्रतिमा म्हणजे या आदिबंधाचाच उत्कृष्ट कलाविष्कार आहे. अशाच प्रकारे राधा-कृष्ण यांची आदिम प्रेमकथा ही रेग्यांच्या कवितेतून दिसते.

"झेलिले न पुंजके
झेलिले तुलाच मी
गुलाल लाल शुभ्र वा
तूच तूच त्यात मी
अंग अंग पाखूनी"[२९]

येथे कवी राधेच्या मनाशी एकरूप झाला आहे. तिच्या प्रेमविश्वात बेभान झाला आहे.

पु.शि. रेगे यांची सुखलोलुप वृत्ती, भोगशील स्वभाव कविता कवितांमधून व्यक्त झाला आहे. त्यांच्या स्वच्छंद वृत्तीला वेगळेच परिमाण या कवितांनी लाभले आहे. त्यांची सर्वसंचारी प्रतिभा-जीवनातील प्रेमानुभव संवेदनशिल वृत्तीने व निरात्मभावाने सहजपणे प्रतिभाबध्द करताना दिसते. स्त्री आणि पुरूष या दोन भूमिकांशी एकरूप झालेले रेग्यांचे मन स्वत:भोवती सतत फिरत राहते. त्या व्यतिरिक्त अन्य कुणालाही त्यात प्रवेश नाही.

"गोल गोल फिरताना
माझेच एक वर्तुळ होते
झाड पाणी आकाश डोळे
यांचेच एक कडे फिरते "[३०]

याच जीवनानुभवाशी त्यांची प्रतिभा केंद्रित झाली आहे. स्वत:ची वेगळी काव्यभाषा घडवितांना रेगेंनी ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ या सर्वांचा विशिष्ट प्रकारे वापर केला आहे.

मर्ढेकर, मुक्तिबोध आणि पु.शि. रेगे यांच्या काव्यातून मराठीतील नवकवितेची गंगोत्रि त्रिवेणी रुपाने जोमदारपणे पुढे निघाली. वास्तववादाची दोन रूपे-विफलता आणि आशा, शुन्यवाद आणि विरोध-विकासवादाची धार मर्ढेकर आणि मुक्तिबोध यांच्या काव्यात प्रकट झाली तर सौंदर्यवादाची नवस्वच्छंदी नवसंवेदनशील धारा रेग्यांच्या काव्यातून प्रवाहीत होऊ शकली. मर्ढेकर, मुक्तीबोध संपूर्णपणे सौंदर्यवंचित आहेत असेही नाही, पण त्यांच्या

काव्याची प्रधान प्रवृत्ती तशी आहे. कवितेचे विषय, तंत्र आणि शैली या तिन्ही अंगांनी रेगे, मर्ढेकर यांनी परिवर्तन घडविले.

नवकाव्याची त्रिवेणी पुढील नवकवींच्या पिढीत अधिकाधिक एकरूप होत गेली. करंदीकरांच्या 'स्वेदगंगे' वरून ते मुक्तिबोधांची परंपरा चालवतील असे वाटत होते. हे अनुमान त्यांच्या उपरोधिक, सामाजिक, राजकीय जाणीवेच्या कवितांनी चुकीचे ठरवले. वसंत बापट सौंदर्यलक्षी असले त्यांचेही सामाजिक भान सुटलेले नाही. केवळ कुरूपदर्शनालाच नवकाव्य मानल्यामुळे रा.अ. काळेले यांना पाडगावकर, बापट, इंदिरा संत, सदानंद रेगे, यांना नवकवीत समावेश करता आला नाही. परंतु नवकाव्य संबंधीची ही संकुचित भूमिका सोडून दिली पाहिजे.

नवकाव्याची दुसरी पिढी उदयास येत असतानाच वसंत हजरनीस, गं.ब. ग्रामोपाध्ये व य.द.भावे या कवींनीही आपल्या परीने नवकाव्यात काही भर घातली आहे.

## नवकाव्याचे दुसरे पर्व

नवकवितेला अधिक प्रमाणात आत्मसात करीत व आपले मुलत: असलेले वेगळेपण कायम टिकवून पुढे येणाऱ्या कवींच्यात विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर व वसंत बापट यांच्या धारेला 'त्रिवेणीधारा' असे संबोधले जाते. कारण रविकिरण मंडळासारखी एकसाची न होता किंवा एकसारखी न होता एकत्र नांदून प्रभाव गाजवून गेलेली ही कविता आहे. काव्य वाचनाव्दारे काव्यदर्शन एवढयापुरतेच त्यांचे एकत्रपण आहे. काव्यगायनाची जागा काव्यवाचनाने घ्यावी ही घटना देखील नमूद करण्याजोगी आहे. कारण ती बदलत्या काव्यप्रवृत्तीची द्योतक आहे. नवकाव्याच्या लक्षणांचा आपापल्या पिंडधर्माप्रमाणे स्वीकार करीत पुढील कवीनी हा नवकाव्याचा प्रवाह खळाळत ठेवलेला दिसतो.

## चिंतनशील विंदा करंदीकर

हे नवकवितेतील एक अग्रेसर कवी असून इ.स.२००४-०५ चा साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना मिळाला आहे. आजच्या युगातले निरनिराळे सर्वच अंत:प्रवाह त्यांच्या कवितात आढळतात. अ.ना. देशपांडे यांचे मत, "करंदीकरांच्या या विविध विषयावरील कविता वाचीत असताना आपण स्वतंत्र आणि विकसित व्यक्तिमत्वाच्या

सानिध्यात आहोत असे वाटत नाही"[३१] असे असले तरी त्यांच्या कवितेत 'रांगडे चैतन्य आणि जोमदारपणा' ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्टये, तसेच चिंतनशीलता आणि प्रायोगिकता हेही विशेष दिसून येतात. ते एक सामर्थ्यशाली कवी असून नवकाव्याची पायवाट त्यांनी हमरस्ता केली.

१९४९ ते १९८१ हा करंदीकरांच्या लेखनाचा प्रकाशन काल. याच काळात काव्याला संमांतरपणे असे त्याचे बालकविता, लघुनिबंध व समीक्षा या प्रकारामधील लेखनही प्रसिध्द झाले. 'ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र', 'फाऊस्ट', 'राजा लिअर' ही भाषांतरे व 'अमृतानुभवाचे अर्वाचीनीकरण' करुन आपल्या वाङमयीन वाटचालीतील महत्वाच्या कार्याची सिध्दता केली. आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा हे टोकाचे शब्द टाळून जीवननिष्ठेचा पुरस्कार करणारी त्यांची कविता नवनव्या अनुभवापाशी नवी वळणे घेत अविष्काराची नवी रूपे प्रकट करते. सामाजिक, लैंगिक, चिंतनात्मक अशी त्यामधली परस्पर समावेशक रूपे ही या विशिष्ट जाणिवनिष्ठेत एकरूप पावतात. करंदीकरांच्या कवितेतील प्रयोग नहेमीच उत्फूर्तपणे अनुभवांच्या आंतरिक निकडीतून येतात.

## जिवनाविषयक चिंतन

करंदीकरांच्या चिंतनशील कवितात जीवनाचे व अस्तित्वाचे सत्य स्वरुप जाणून घेण्याची तीव्र प्रेरणा आढळते या आपल्या ध्यासाकडे जाताना करंदीकर कुठल्याच एका दर्शनाला बांधील रहात नाहीत. जीवितानुभवाचे कोडे उलगडू पाहणारी सर्व दर्शने त्यांना आपल्या मार्गात प्रकाशदायी वाटतात.

'स्वेदगंगा' (१९४९) व 'मृदंगंध' (१९५४) या काव्य संग्रहातील काव्यलेखन काळात त्यांचे मन साम्यवादी क्रांतीच्या आवेशाने भारावून गेले होते. काणेकर, कुसुमाग्रज, मुक्तिबोध यांच्या काव्यातून आलेल्या लाल धारेला विंदांच्या काव्यानेही जोम दिला. मराठी समाजाच्या मध्यम वर्गातून पुढे येऊन साम्यवादाचा स्वीकार केलेला करंदीकर हा अखेरचा प्रतिभावंत असे म्हणावे लागेल.

'तेच ते' या कवितेत मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनाला आलेल्या यांत्रिकपणाचे, एकसुरीपणचे आणि परिणामी नि:सत्वतेचे उपरोधिक चित्रण या कवितेत करताना ते म्हणतात,

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आणि झोपल्यानंतरही ठराविक चाकोरीतले ठराविक कार्यक्रम ही माणसे यांत्रिकपणे पार पाडीत असतात. ज्यात प्राणशक्तीचा, साहसाचा स्पर्शही होत नाही. असे हे जीवन जणू एक स्थळ कर्मकांडच बनले असते. सकाळ पासून रात्रीपर्यंत या जीवनाचे पालूपद एकच; तेच ते ! तेच ते या आयुष्याचा हिशोब म्हणजे,

"तेच ते आंबट सार
सुख थोडे दु:ख फार !"

मोठे यश किंवा मोठे अपयश यांच्याकडे ती माणसे जीव ओवाळून झेप टाकीत नाहीत. त्यातल्यात्यात खानावळ बदलून पाहतात पण जीव बदलणे शक्य नसल्यामूळे तोच तोच भाजीपाला आणि तीच तीच खवट चटणी त्यांच्या वाटयाला येते.

'माझ्या मना बन दगड' या कवितेत करंदीकरांना समाजातील अन्याय अत्याचार बघून निराशा येते आणि हे सर्व अटळ असल्यामुळे मनाला दगड बनण्यास सांगतात. शेवटी या सर्वांचे रक्त आपल्याला साम्यवादी राजकीय क्रांती निर्माण होण्याला मदत करील असा आशावाद व्यक्त करतात.

समाजात अनेक प्रकारच्या अनिष्ट चाली, परंपरा असल्या तरी काही चांगल्या रुढी-परंपरांचा या संस्कृतीला साज होता. त्यामुळे मानवाच्या जिवनात एक प्रकारचे चैतन्य होते, रसरसलेपण होते. हे काहीच राहिलेले नाही. कुणालाच सांस्कृतीक व सामाजिक जीवनाची चिंता राहिलेली नाही. प्रत्येकजण हे जीवन आहे, आपण जिवंत आहोतोपर्यंत जगायचे एवढेच ध्यानात घेऊन जगत आहे. युध्द हिंसेचे, अशांततेचे प्रतीक असले तरी ते कोणात्यातरी ध्येयाने पछाडलेले असते. परंतु इथे युध्दही नाही आणि बुध्दही नाही. ह्या समाज शून्यवत झाला आहे. एकमेकांची सुखदु:खे वाटण्याचे त्याला भान उरलेले नाही. इथे कोणत्याही भावनेला गंध नाही, वेदनाही नाही. जीवन अगदी निराश गद्यमय झाले आहे. अशा समाजाबद्दलची विफलतेची निराशेची जाणीव रेखाटताना कवी म्हणतो,

"जाणिवेची याच साधी
राहिली मागे उपाधी
या जडांच्या जांभया हो
ना तरी आहे समाधी"

असा हा समाज त्यांना अचलांच्या जांभयाप्रमाणे आळशी वाटतो. नाही तरी त्याची समाधी असावी असे त्यांना वाटते.

## मानवतावादी कविता

करंदीकरांच्या कवितेवर मर्ढेकरांची छाप पडली असली तरी त्यांच्या प्रमाणे मानवी अस्तित्वासंबधीचे प्रश्न त्यांच्या समोर कधीच पडलेले दिसत नाही. केशवसुत, कुसुमाग्रज, अनिल यांच्या प्रमाणे करंदीकरांनीही मानवी अस्तित्व सतत गृहीत धरले आहे. त्यांच्या कवितेत सभोवतालच्या जीवनाचा तपशील आला असला तरी त्यांच्यात पारंपारिक मूल्यकल्पनांवर, विज्ञानावर व मानवतेवर निष्ठा असलेचे त्यांच्या सर्वच कवितांतून व्यक्त होते. सुधीर रसाळ म्हणतात, "१९५५ च्या पूर्वी करंदीकरांची कविता सामान्यपणे सभोतालच्या जीवनातील तपशीलाची एक विशिष्ट प्रकारे मांडणी करीत होती. हा तपशील आणि या तपशीलातून स्वीकारलेल्या प्रतिमा यांची विरोधात्मक रचना करणे व यारचनेतून एक परिणामकारक नाटय (अनेकदा नाटकीपणाही) व्यक्त करणे ही करंदीकरांची खास अभिव्यक्ती होती ." [३२] रसाळानी करंदीकरांच्या कवितेचे वेगळेपण नेमकेपणाने सांगितले आहे. आपल्या खास शैलीतून करंदीकर मानवतावादी भूमिका स्पष्ट करतात. एकंदरीत सामाजिक, राजकीय विषयापासून काव्याला सुरुवात करून अमूर्त संवेदनक्षमतेकडे त्यांच्या प्रयोगशील कवितेचा प्रवास चालू आहे. जोमदार बेदरकार शब्दकला, भावनेची उत्कटता आणि प्रयोगशिल नाविन्य या अंगानी विंदानी मराठी कवितेला पुढे नेले. साठोत्तरी कवींच्या कविंतेतील रांगडया जोमदारपणाची आणि आक्रमकपणाची तयारी आपल्या कवितामधून केली असे म्हणता येईल.

## आत्माविष्कारी वसंत बापट

वसंत बापट यांची प्रवृत्ती मुक्तछंदाला जवळची असून त्यांच्या लावण्यातून शाहिरी बाज ढंगदारपणे दिसून येत असले तरी सुध्दा त्यांचा समावेश नवकवित होतो याचे कारण म्हणजे, "कवितेच्या नव्या स्वरूपाविषयीची जाणीव त्यांच्या काव्यातून प्रत्ययास येते. पु.शि. रेगे यांच्या नवकाव्याच्या सौंदर्यलक्षी प्रवाहाला आपल्या वैशिष्टयपूर्ण कवीव्यक्तित्वाने बापट परिपुष्ट करतात. दुसरे म्हणजे सामाजिक, राजकीय जाणीवतेचे त्याना प्रथमपासूनच भान आहे. निसर्गप्रतिमांचे आशयाशी एकरूपत्व त्यांनी साधले आहे. शृंगाराच्या हळूवार छटा त्यांनी

नव्यानेच रेखाटलेल्या आहेत. नवकाव्यांतर्गत नवस्वच्छंदतावादाचे अंतर्व्दव्द वंसत बापट यांच्या कवितेत जाणवते"[३३] असे त्यांच्या कवितेचे अचूक मूल्यमापन अ. ना. देशपांडे करतात. बापट हे समाजवादी विचारसरणीचक आणि समाजाभिमुख वृत्तीचे कवी आहेत. त्यामुळे त्यांची कविता ही समाजाची सुखदु:खे निष्ठेने मांडणारी आहे. सर्वसमानता आणि सामाजिक सुखे जोपर्यंत निर्माण होत नाहीत तोपर्यत कविमन स्वस्थ रहात नाही. तर ते दु:खाला, समस्यांना वाचा फोडीत राहते. जसे -

"जोवरी सुखाचा घास नसे सर्वांना
जोवरी न झाल्या उन्नत अवघ्या माना
जोवरी अभंग न झाला सर्व समाज
जोवरी श्रमाविण अन्न मिळे धनिकांना
तोवरी गुलाम राहिल अपूला देश"[३४]

अशी आपल्या पारतंत्र्याची मीमांसा कवी करतो. सामाजिक बांधिलकी ठेवणे हे बापटांच्या कवितेचे वैशिष्टय आहे. मानवतावादाचा पुरस्कारही त्यांच्या कवितेत सतत दिसतो. अत्यंत संवेदनाक्षम अंत:करणाने बापटांनी समाज दु:खे चव्हाटयावर आणली आहेत. कवीला आनंदाची ओढ आहे. सौख्याची कवने गावीत असे कवीला मनापासून वाटते. पण आपण समाजाशी निबध्द आहोत याचा विसर कधी पडत नाही. म्हणूनच तो म्हणतो -

"आनंद नि सौख्याची
गाऊ कशी नवकवने ।
आक्रंदती, आक्रोशती,
शोकाने भूमि भुवने"[३५]

या आक्रंदनाने कविमन जणू गोठून गेले आहे. सर्वत्र प्रेममय शांती लाभो हीच त्यांची तळमळीची इच्छा आहे. विभुतिपूजेला बापटांचा विरोध नाही, उलट विभूतीचे आदर्श समोर ठेवून समाजपरिवर्तन घडावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत थोर पुरुषांच्या प्रतिमा आवर्जून येतात, लोकमानसाला जागे करु पाहतात. जसे -

"गांधीजीच्या उपदेशाची
स्मृर्ती तयाला राहो साची
त्या हृदयाला उदारतेचे
अनुकरण तदा होवो साचे
मानवतेची करण्या पूजा

स्फूर्ती सतत लाभो मनुजा"[३६]

प्रतिमा निर्मितीचा फारसा सोस न बाळगता बापटांची कविता सरळ आशयाची अभिव्यक्ती करताना दिसते. मात्र 'माणूस' किंवा 'समाज' हीच त्यांच्या कवितेमागील मूलभूत प्रेरणा आहे लक्षात घेण्यासारखे आहे. बापटानी आत्मविष्काराला महत्व दिलेले आहे.

## भावकवयित्री इंदिरा संत

विशुध्द भावकविता लिहिणाऱ्या कवयित्री म्हणून इंदिरा संताचा समावेश नवकाव्याच्या दुसऱ्या पर्वात केला जातो. त्यांनी मराठी स्त्रीगीताच्या संस्कारातून शैली उचलली व स्वत:च्या उत्कट भावनाविष्काराला प्राधान्य दिले. 'सहवास' (१९४१) संत पती-पत्नीचा संयुक्त संग्रह, बाकीची त्यांची कविता 'शेला' (१९५१),'मेंदी' (१९५५), 'चित्कळा' (१९८९), 'गर्भरेशीम' (१९९०), 'वंशकुसूम' (१९९४) या संग्रहातून प्रकाशित झाली आहे. "प्रिय पतीच्या चिरविरहाची आर्तताच अनेक छटातून हळुवारपणे, उत्कट संवेदनशीलतेने व्यक्त झालेली आहे. या मर्यादेतच त्यांच्या भाववृत्ती अत्यंत सखोल उत्कट, अंतर्गत लयीने भरलेल्या आहेत. त्या प्रतिभरुप होऊन जी क्षणचित्रे उभी करतात ती सहजच उत्कट भवकाव्याच्या पातळीवर जाऊन पोहचतात"[३७] या भावकाव्यातही प्रगल्भता, अनुवसिध्द तटस्थता आहे.

## भावकवितेलील निसर्ग

प्रत्यक्ष अनुभूतीचा क्षण, स्मृतीजीवन याचे केलेले व्यामिश्र प्रतिमांकन ही इंदिरा संताच्या कवितेची वैशिष्टय आहेत. तरल व मधुर संवेदनांची सतत जाणीव त्यांच्या ठिकाणी आहे. कवितेमध्ये स्त्रीमनाचा हळुवारपणा सतत जाणवत राहतो. स्त्रीसुलभ प्रतिमांचाही सुयोग्य वापर करताना कोणत्याही प्रकारचे भाव प्रदर्शन नसते, भडकपणा नसतो. स्फुटतेपेक्षा अस्फुटतेने भावनांची आंदोलने दाखविण्यात इंदिरा संत कुशल आहेत. त्यांच्या प्रतिभेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांच्या मनोवृत्तीचे निसर्गाशी अखंड चाळे चाललेले असतात. या निसर्गवादा--मुळेच त्यांची कविता अधिक भावपूर्ण झालेली आहे.

त्यांची निसर्ग कविता वाचताना ती प्रेमकविता असावी असा भास होण्याइतपत त्या दोहोतील अभिन्नता जाणवत असते. जसे -

"वाट पहाते तुझी अशी मी
तृप्त सुखाच्या निवांत कुरणी
सरीत पाहिल्या,
साज होवूनी धूळफूलांचा
होवून पाऊल वाट सुगंधा"[३८]

प्रियकराची वाट पाहणाऱ्या प्रियेचे हें मनोगत आहे. पहिल्या प्रेमवर्षावाने सुखावलेली अशी ती धुळफुलांचा साज लेवून जणू सुगंधा पाऊलवाट होऊन सुखाच्या कुरणी वाट पहात आहे. दृकसंवंदनेबरोबरच गंधसंवेदना प्रतीत करून देणारी ही रचना आहे. कवयित्री निर्मित धुळफुले ही प्रतिमा अर्थाची विविध वलये निर्माण करते.

## प्रेमभावाचे चित्रण

इंदिरा संताची प्रेमकविता हळूवार आहे. अस्फुट प्रेमाचे दर्शन तिच्यामधून घडते. कोठेही प्रदर्शनी वृत्ती किंवा वासनामयता यांचा स्पर्शही नाही. मुग्ध प्रेमकविता म्हणूनच त्यांच्या कवितांना संबोधले जाते.

"आठवते प्रेम तुझे
पुर्ण चंद्र पौर्णिमेचा
तसा तुझा सहवास
झिरी झिरी चांदण्याचा"[३९]

चंद्र, चांदणे आणि प्रेम यांची जवळीक ही पारंपारिने चालत आलली कविकल्पना असूनही कवयित्रीने तिचा वापर अर्थसुलभ व चित्रदर्शी स्वरुपात केला आहे. प्रेम आणि चांदणे सहवास या प्रतिमा झिरपल्यासारखा वाटतो. सहजसूंदर शब्दरचनेतून कवयित्रीने सूक्ष्म अशा संवेदनांची प्रतीतीही येथे आणून दिली आहे. संवेदनात्मक अभिव्यक्ती हेच इंदिरा संताचे खास वैशिष्टय आहे.

"अशी हरवली राणी मीरा
अशी हरवली राधा गवळण
असेच मी मज हरवून जावे
हेच तुझ्या मनि जागत का ?"[४०]

या ओळीतून राधा व मीरा या प्रमिकांचा उल्लेख आला आहे. कवयित्री 'मीरा-राधा' यांच्या प्रेमाला सर्वस्व मानन्याची भावना बाळगून आहे. या स्त्रीप्रतिमा जणू मिथ स्वरुपात

आल्या आहेत असे वाटते. कारण त्याव्दारे कृष्ण-मीरा, कृष्ण-राधा यांच्या प्रेमाचे आदिरूप अपेक्षित आहे. इंदिरा संताच्या कवितेतून येणाऱ्या प्रतिमा अनुभवांशी एकरूप होऊनच येतात त्यामुळे त्या अधिकच प्रभावी होतात. जातिवंत विशुध्द भावकविता हेच त्यांच्या कविताचे ठळक वैशिष्टय म्हणावे लागेल. आधुनिक मराठी कवयित्रिंची कविता स्वत:शी व काळाशी संवाद व संगती राखणारी आहे. इंदिरा संताचाच वारसा संजिवनी मराठे, अनुराधा पोतदार, शिरीष पै, पद्मा गोळे, मलिका अमरशेख, नीरजा, हिरा बनसोडे, आसावरी काकडे इ.इ. कवयित्री पुढे नेत आहेत.

## आत्मनिष्ठ कवी दिलीप चित्रे

नवकवींचा विचार करीत असताना आत्मनिष्ठेची पराकोटी असलेले कवी म्हणून दिलीप चित्रे यांचा उल्लेख करावा लागेल. आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत नवीन वाटेने जाणारे आणि आत्मभावाची तीव्रता आसणारे कवी म्हणून चित्रे ओळखले जातात. 'आधुनिक कवितेला सात छेद' या त्यांच्या पाश्चात्य कवींच्या अपभ्रंशाचा व अभ्यासाचा परिणाम त्यांच्या काव्यावर झालेला दिसतो. चित्र्यांनी सुनीत, गझल, गीत असे रचना प्रकारही हाताळले आहेत पण त्यांना वेगळे वैशिष्टय नसते. त्या त्यांच्या कविताच असतात. त्यांनी रोमँटीक प्रतिमांची संघटना करुन भाव प्रत्यय दिला तर अनुप्रासादि शब्दव्यांजित प्रतिमा, उपरोधपूर्ण प्रतिमा अशा वेगवेगळ्या स्वरुपाच्या प्रतिमांतून त्यांचे काव्य खुलताना दिसते. त्यांच्या कविता चिंतनात्मक व भावनात्मक वैशिष्टये असलेल्या आहेत. 'शक्तीस्तोत्र'ही त्यांची दीर्घ चिंतनाशील कविता, आधूनिक मराठी कवितेतील एक विलक्षण झपाटून टाकणारी कविता होय. 'सार्वजनिक बागेतील खाजगी कविता' सारख्या कवितेतून चित्रे यांनी नव्या मराठी कवितेचे वळण स्पष्ट केले आहे. त्याच्या काही कवितातून सामाजिक वास्तवाचे भान मोठया विदारकपणे प्रत्ययाला येते. मर्ढेकरांच्या काव्यपरंपरेची विशिष्ट प्रवृत्ती चित्र्यांच्या कवितेतून विकसित होत राहिलेली आहे असे जाणवते.

"तुझ्या सर्वांगाला वळसा घालताना माझी आजवरची
सर्व शरीर सावल्या सावल्या होऊन पांगून गेली
एक तप्त शुभ्रतेच्या मुशीत वळसा घालताना
अस्तित्वाची बावनकशी लगड बघता बघता वितळली" [४१]

स्वत:ची जाणीव विसरुन प्रेमानुभवाशी कविमन एकरूप होताना दिसते एक प्रकारे हा अंगमुक्तीचा सोहळाच आहे. शरीराकडून अशरीराकडे कविमनाची धाव सतत चाललेली आहे असेही दिसून येते. विकसनशील प्रतिमांची नवी काव्यभाषा घेऊन दिलीप चित्रेंची कवीता आली आहे.

चित्र्यांचे जीवन मुंबई सारख्या महानगरात गेल्यामुळे त्या महानगराशी संबधित अशा प्रतीक प्रतिमांचे दर्शनही त्यांच्या कवितेत घडते. जसे

"शहरातून निराळ्या शहरात
लोखंडी पुलावरुन चालतात
गर्दीचे लक्षपाद कीटक ; तु एक पाय
अनेंकांसकट हालणार ; तु एक पाय
विचार करणारा , सुज्ञ आणि अनवाणी,
पण पायच फक्त......"[४२]

चित्र्यांची कविता वास्तवाला सामोरी जाणारी असल्यामुळे तिच्यात सामाजिक वास्तवाचे भान अनेकदा विदारकपणे प्रत्ययाला येते. जसे -

"काळीभोर प्राजक्त
घनघोर रक्त
गेलीत तर इंद्रिय आटून
उरल्यात उघडया
अजस्त्र नाकपुडया"[४३]

चित्र्यांच्या जाणिवा या अशा एकसमावयच्छेदे करून अनुभवात उतरतात. मुलत: ऐद्रिय संवेदनाच्या माध्यमातून चित्र्यांना सारा विश्वानुभव प्रतीत होतो. ऐंद्रिय संवेदनाखेरिजच्या कोणत्याच गोष्टीत चित्रे मानत नाहीत स्त्री पुरुष संबधातील थेटपणा चित्रित करणारे दिलीप चित्रे हे पहिले कवी आहेत. रतिभावाच्या चित्रणात शब्दांचा, प्रतिमांचा ते सुरेख वापर करतात. चित्र्यांच्या कवितेचा पुष्कळच प्रभाव समकालीन अरूण कोल्हटकर नेभाडे यांच्यावर आणि उत्तर कालीन ना.धो. महानोर, वसंत गुर्जर, नामदेव ढसाळ, चंद्रकांत पाटील, परबं याच्यावर पडला.

## सौदंर्यजीवी मंगेश पाडगावकर

वर उदधृत केलेल्या नवकवींच्या कवितेंशी पाडगावकरांच्या कवितेचे अत्यंत जवळचे नाते आहे. जसे साम्य आहे तसेच भेदही भरपूर आहेत. प्रत्येक कवीची अनुभव घेण्याची अणि अभिव्यक्त करण्याची पध्दती भिन्न असल्याचा प्रत्यय येतोच. मंगेश पाडगावकर जीवनवादी, वास्तववादी आणि अधिक आशावादी आहेत. अत्यंत संवेदनशील मनाने त्यांनी अनुभव टिपले आहेत. पाडगावकरांचे काव्यकर्तृत्व पुढील काव्यसंग्रहाव्दारे दिसून येतात.

| अ.न. | कवितासंग्रह | सन |
|---|---|---|
| १ | धारा नृत्य | १९५० |
| २ | जिप्सी | १९५३ |
| ३ | उत्सव | १९६२ |
| ४ | भटकेपक्षी | १९८४ |
| ५ | शर्मिष्ठा | १९६० |
| ६ | वात्राटिका | १९६४ |
| ७ | सलाम | १९७८ |
| ८ | विदुषक | १९६६ |
| ९ | गझल | १९८१ |
| १० | मीरा | १९६५ |
| ११ | राधा | २००० |
| १२ | बालकविता संग्रह | १९९२ |
| | I चांदोमामा | १९९२ |
| | II सुट्टी एके सुट्टी | १९९२ |
| | III वेड कोकरु | १९९२ |
| | IV आता खेळा नाचा | १९९२ |
| | V झूले बाई झूला | १९९२ |
| | VI नवा दिवस | १९९३ |
| १३ | बोल गाणी | १९९० |
| १४ | गीता | १९८९ |
| १५ | तुझे गीत गाण्यासाठी | १९८९ |
| १६ | उदासबोध | १९९४ |
| १७ | छोरी | १९५७ |
| १८ | निंबोनीच्या झाडामागे | १९५४ |
| १९ | भोलनाथ | १९६४ |

| | | |
|---|---|---|
| २० | **बबलगम** | १९६७ |
| २१ | **त्रिवेणी** | १९९५ |
| २२ | **कबीर** | १९९७ |
| २३ | **मोरू** | १९९९ |
| २४ | **कविता माणसांच्या माणसांसाठी** | १९९९ |
| २५ | **वाढदिवसाची भेट** | २००१ |
| २६ | **अफाटराव** | २००१ |
| २७ | **फूलपाखरु निळं निळं** | २००१ |
| २८ | **वादळ** (शेक्सपीअरच्या द टेंपेस्ट नाटकाचे भाषांतर) | |

पाडगांवकर हे बोरकरांच्या निसर्ग संवेदनासमृध्द कवितेचे संस्कार घेऊन आले पण लवकरच त्यांनी स्वतःचे काव्यविश्व उभारले. तरल, कोमल, निसर्ग संवेदना आणि कोवळया नाजूक प्रेमभावनेच्या छटा यांचा गहिरा अविष्कार त्यांनी केला. मराठी कवितेची शब्दकला त्यांनी ऋजु बनवली, नाजूक भावभावनांची आणि सूक्ष्म तरल निसर्गसंवेदनांची मानोज्ञ गुंफण केली. म्हणूनच, " बालकवींच्या नंतर पुन्हा एकदा जातिवंत निसर्गकवी भेटतो की काय अशी आशा निर्माण झाली." [४४] असे मत १९७७ मध्ये निशिकांत ठाकरनी व्यक्त केले आहे. 'छोरी' पर्यंतची त्यांची कविता अशा प्रकारची आहे. पुढे त्यांच्या काव्यात नव्यानेच सामजिक जाणिवा प्रभाव गाजवू लागल्या, 'विदूषक', 'सलाम','गझल' या संग्रहात त्यांनी स्वातंत्र्योत्तर समाज जीवनातील राजकीय, सामाजिक विषयावर उपरोध पूर्ण आणि विदारक भाष्य केलेले आहे. मधल्या काळात'वात्रटिका' या हालक्या फुलक्या विनोदी वळणाचा वापरही त्यांनी केला. करंदीकर बापट यांच्याप्रमाणेच त्यांनीही गझल या काव्यप्रकाराची हाताळणी केली. पाडगावकरांची गझल सामाजिक जाणीवेची वाहक आहे पण त्यांचा मुळ पिंड कोमल भाववृत्तीचा आहे. असेच त्यांच्या सर्व कविता वाचल्यानंतर वाटते.

पाडगावकरांची कविता प्रामुख्याने प्रेमकविता व निसर्गकविता अशा दोन प्रकारात मोडते. निसर्गाशी सहजगत्या मनसंवाद साधतात. त्यामुळे त्यांच्या निसर्गकवितेलाच त्यांच्या भाववृत्तीची जोड मिळते. पाडगावकरांची प्रतिभा केवळ निसर्गप्रतिमांशीच बोलत राहते. विविध संवेदनांची जाणीव करुन देत देत त्यांची कविता प्रकट होते. निसर्गदर्शनापेक्षा कधी कधी

कविमनाचे दर्शनच अधिक घडत जाते. कवीची वृत्ती निसर्गातील सौंदर्य स्थळे शोधत राहते. ऐन्द्रिय भावना व्यक्त करण्यासाठी कविमन निसर्गाशी जवळी साधू लागते. जसे -

"रे किती लपविले तरिही
मज नकळत कळते
पाकळयात दडले परिही
गंधातून गुढ उकलते "[४५]

सृष्टीच्या विविध सुंदर रुपात त्यांना अंतिम सत्याचा साक्षतकार होत होता. म्हणूनच एक अनमिक गूढतरल, गंधधुंद संवेदना त्याच्या कवितेतून व्यक्त होते. पाडगावंकरानी पार्थिवतेचा जयजयकार नि:संकोचपणे केला आहे. ते म्हणतात.

"हे पार्थिवते
केला त्यांनी अव्हेर तूझा
आणिक आले दैन्यच अती भाळी
षड्रस झाले रूष्ट .. भूमि अश्रध्दमनापरि वंध्या झाली
अज्ञातानी गिळिले सोने पृथ्वीच्या उदरीचे
लुप्त जाहली रत्ने आणि नावाचा उरला रत्नाकर"[४६]

पृथ्वीची अशी दुर्दशा पार्थिवतेचा धिक्कार करुन 'ब्रम्ह सत्य जग मिथ्या' म्हणणऱ्यांनी केली आहे. मातीची कवच भेदून येणारे लसलसणारे हिरवेगर पाते, संधेची शोभा, उषेचे सौंदर्य या साऱ्या रस, रंग, गंध दर्शक चैतन्यालाच नाकारले आहे. कवीला या चैतन्याचा गौरव करावेसे वाटते.

पाडगावकरांची कविता ही समकालीन इतर कवीपेक्षा अधिक सुबोध आहे. प्रतिमा-प्रतिकांचा फारसा हव्यास त्यांच्या कल्पनाशक्तीला नाही. व्यक्तीगत जीवन व निसर्ग यांच्यामधून येणारे विविध अनुभव भावपूर्ण शब्दात अविष्कृत करणे हेच त्यांच्या काव्यशक्तीचे वैशिष्टय म्हणता येईल.

## सारांश

मराठी कवितेचे 'प्राचीन आधुनिक आणि नव' असे स्थूलमानाने विभाग पाडले जातात. हे विभाग कालवाचक आहेत तसेच ते कवितेच्या बदललेल्या प्रवृत्ती अविष्करणाच्या वेगळ्या वाटा दाखवणारे ही आहेत.

प्राचीन मराठी कविता ही संत कविता होय. या काळातील कविंनी प्रमुख्याने अध्यात्मिक विषयावर काव्यलेखन केले आहे. ज्ञानेश्वरांच्या पूर्व कालात महानुभवीय कवींनी देखील काव्यरचना केलेली आहे. संत कवितेनंतर शाहिरी काव्य आले. ज्या मध्ये मानवी भावनांचा उघड उघड अविष्कार झालेला दिसतो. प्रेमाची भावना स्वत:ची म्हणून त्यांनी उघड केली आहे. संतानी मात्र देवादिकांचेच प्रेम व्यक्त केले. इंग्रजी आणि इतर भाषांतील (हिंदी,उर्दू, अरबी) वाङमयाच्या वाचनामुळे मराठी कवितेचे स्वरूपही बदलत गेले. केशवसुतांनी बदलत्या स्वरुपाची वेगळी कविता लिहिली. ते आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून ओळखले गेले. आध्यात्म विषयाखेरीजच्या विविध मानवी भावभावना, निसर्ग, सामाजिक घटना, परंपरा, रुढी विषयक विचार या सर्वांनाच त्यांच्या कवितेत स्थान मिळाले. नंतरच्या काळात अनेकांनी अशा प्रकारची कविता लिहीली.

रविकिरण मंडळाची कविता आधुनिक काळातील असूनही स्वत:ची वेगळी गुणवैशिष्टये असणारी गेयतेला प्राधान्य देणारी आहे.

अविष्काराच्या पध्दती सूक्ष्म स्वरुपात पण हळूहळू बदलतच असतात. प्रत्येक कवीची अनुभव घेण्याची आणि अनुभव अभिव्यक्त करण्याची पध्दत यामध्ये बदल सुक्ष्मरित्या होत असतात. यमक अनुप्रासादी छंदाचे बंधन न घेता, गेयतेला फारसे महत्व न देता फक्त भवनेची अभिव्यक्ती महत्वाची मानणारी, शब्दातील अंतर्गत लय सांभाळणारी मुक्तछंदात्मक कविता अवतरली. कवी अनिलांनी मुक्तछंदाचा हिरीरीने पुरस्कार करुन कविता लिहीली. त्याचे अनुकरण करणाऱ्या अनेकांनी मुक्त छंद आपलासा केला आणि नवकविता जन्मली.

नवकाव्याचे प्रवर्तक म्हणून मर्ढेकरांचा उल्लेख केला जातो. त्यांची कविता मुक्तछंदात्मक आहे. मात्र त्यामधून व्यक्त होणारी जाणीव पूर्वीच्या इतर कवींच्या पेक्षा अनेक बाबतीत निराळी आहे. शिवाय तिची भाषा देखील निराळीच आहे. अशा प्रकारे आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही संदर्भांनी नवकविता वेगळीच ठरते.

नवकाव्याला 'मॉडर्नीस्ट' या अर्थाने म्हणावे असे ग्रामोपाध्ये सूचवितात. तर भ. श्री. पंडीत 'प्रचलित नवकविता' असा शब्द प्रयोग नवकवितेसंदर्भात वापरतात. या नवकवितेत आत्मपरता, स्वप्नाळूपणा आणि पलायनवाद यांचा अभाव आहे. ती जीवनातील वास्तवाला थेट भिडणारी आहे. तिच्यात कल्पनारम्यता नाही. अर्थात यासाठी देशात आणि देशाबाहेर घडलेल्या

अनेक घटना कारणीभूत आहेत. महायूध्दे, दुष्काळ, रुढी, परंपरा संदर्भात नव्याजुन्याचा सघर्ष इंग्रजांच्या वास्तव्याने आणि शिक्षणाने समाजात झालेली वैचारिक जाणीव अशा अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. जीवनाला भिडणाऱ्या या कवितेत कृत्रिमता, सांकेतिकता, भावूकता नाही मात्र ठाम असे वैचारिक अधिष्ठान आहे. नवकवींनी फ्राइडच्या मानसशस्त्राचा आधार घेवून मानवी मनातील भावभावनांचे, अंतरमनाचे पदरही अलगदपणे उलघडून दाखवले आहेत. साहजिकच नवकाव्यात अनेकदा मानवीय मनाच्या विरुपतेचे भिषण दर्शनही घडते. नवकवींनी आपल्या भावाभिव्यक्तीसाठी अनेकदा नवप्रतिमांचा वापर केलेला दिसतो. या नवप्रतिमा आणि अबोध मनाच्या हालचाली टिपणारी सांकेतिकता नसणारी गद्यसदृश रचना यामुळे नवकविता प्रारंभीच्या काळात तरी दुर्बोधच वाटली किंबहुना दुर्बोधता हेच या काव्याचे लक्षण होय, असेही काहींनी मानले. उत्तर काळात मात्र दुर्बोधता जावून नवकाव्य पुष्कळच लोकप्रिय झाले. या नवकवितेत छंद व अनुप्रसाचे बंधन नाही, मुक्तछंद आहे. त्यामुळे एखादया कवितेत पहिली ओळ सोळा शब्दाची असते तर दुसरी दोन शब्दांची आणि तिसरी ओळ सात-आठ शब्दांची अशी कशीही रचना असू शकते.

मर्ढेकरांच्या पासून नव्याने सुरु झालेला हा नवकाव्याचा प्रवाह उत्तर काळात मोठयाजोमाने आणि विस्तारीत स्वरुपात वाहताना दिसतो. याच प्रवाहाला पुढे ग्रामीण कविता दलित कविता, विद्रोही कविता हे प्रवाहही येऊन मिळालेले दिसतात. १९६० पर्यंत नवकाव्मची दोन प्रवर्तने घडून येंवून तिला स्थैर्य प्राप्त झाले. या नवकाव्याची संकल्पना अधिक स्पष्ट करण्यासाठी प्रातिनिधीक स्वरुपात सहा नामवंत नवकवींच्या काव्यवैशिष्टयांचा थोडक्यात आढावा येथे घेतला आहे.

बा.सी. मर्ढेकर यांची कविता तीन काव्यसंग्रहातून संग्रहीत झाली आहे. मर्ढेकर केशवसूताप्रमाणेच युगप्रवर्तक म्हणून ओळखले जातात. जुन्या कोणत्याही कवीचे अनुकरण न करता यांनी स्वतंत्रपणे मुक्तछंदात आणि नाविन्यपूर्ण अशा वेगळया प्रतिमांचा वापर करुन काव्यलेखन केले आहे. त्यांची स्वत:ची निश्चित अशी वेगळी काव्यशैली जाणवते. काही काळ त्यांच्या अपरिचित प्रतिमा आणि कल्पनाचित्रे यामुळे ती कविता दुर्बोध वाटली तरी पुढे त्यातून त्यांनी रसिकांच्या आस्वादनक्षमतेला केलेले आवाहन समिक्षकांना जाणवते. समिक्षकांच्या रसग्रहणातून वाचकांना त्यांची कविता वेगळी असल्याचे कळाले. उत्तरकालात रसिकांनाही ती

कविता कळू लागली. रुचली अशी वाचकांच्या बुध्दीची कसोटी पाहणारी कविता मर्ढेकरांनी लिहिली.

मर्ढेकरांच्या कवितेत यंत्रयुगाने निर्माण झालेली मानीव जीवनातली यांत्रिकता आणि दुसऱ्या महायुध्दामुळे बदलेले सामाजिक वास्तव यांचे संदर्भ मोठया प्रमाणात आलेले आहेत. म्हणूनच त्यांची कविता एक अनोखे, वेगळे काव्यविश्व घेवून आली आहेत असे म्हणता येते.

मर्ढेकरांची कविता प्रामुख्याने आत्मकेंद्रीत भावना व्यक्त करणारी आहे. त्यामुळेही काही प्रमाणात ती दुर्बोधतेकडे झुकलेली आहे. तथापि कवीची वृत्ती सौंदर्यलक्षी असल्यामुळे त्यांनी रंगवलेली जी शब्दचित्रे रस, रुप, गंधादी संवेदना व्यक्त करतात. काही तरल संवेदनांचा अविष्कार त्यांनी हळूवारपणे केलेला आहे. 'ओल्या पानातल्या रेषा, वाचतात ओले पक्षी, आणि पोपटी रंगाची, रान दाखविते नक्षी 'अशी सुरेख निसर्गचित्रे त्यांनी रंगविली आहेत.

मर्ढेकरांनी वापरलेल्या नाविन्यपूर्ण प्रतिमा लक्षात घेण्यासारख्याच आहेत. मुंबापुरीच्या बंदराला प्रभात समयी जे सुंदर रुप आहे त्याचे वर्णन करताना कवी न्हालेल्या गर्भवतीची प्रतिमा वापरतात. रात्रीच्या अंध:कारात चमकणाऱ्या दिव्यांना बघून 'पंक्चरली जर रात्र दिव्यांनी' असे म्हणतात. 'काळोखाला काळजाची वात' यामध्ये रुपक असणारी प्रतिमा अर्थाचे विविध पदर उलगडणारी आहे. काही कवितातून त्यांनी साधलेला रसपरिपोष वाखानण्यासारखा आहे. कधी बोरकरांची तर कधी बालकवींची आठवण होते. काही कवितांतुन अधिबंधात्मक प्रतिमा आल्या आहेत. स्त्रीची प्रतिमा वापरून पुढे पुढे मातृत्वाचे पूजन त्यांनी केले आहे.

मर्ढेकरांच्या कवितेत वास्तवाच्या जोडीने अस्तित्ववादाचे दर्शन घडते. मात्र अनेकदा कवीला जीवनाची अर्थहिनता, मूल्यहीनता जाणवते आणि मग त्यांची कविता निराशवादी सूर आळवू लागते. जीवनातील विंसंगती, वैफल्य निराशा सांगता सांगताच ते वास्तवाचा वेध घेतात. यंत्रयुगामुळे सामान्यांच्या जीवनात आलेली कृत्रिमता कवीला अस्वस्थ करते. सगळा उपरेपणा त्यांनी निर्भय फटकळपणाने व्यक्त केला आहे.

**मर्ढेकर प्रयोगशील कवी होते. त्यांनी मराठी कवितेची परिभाषाच बदलून टाकली आणि त्यात नविनतेची संजिवनी ओतली, वाङ्मयीन महात्मता सांगून सौंदर्यशास्त्राचे नवे सिंध्दांत मांडले. समिक्षाक्षेत्रातही मोलाची भर घातली.**

'नवी मळवाट' या काव्य संग्रहाव्दारे रसिकांना परिचीत झालेले शरच्चंद्र मुक्तिबोध कवी अनिलांचे अनुकरण करीत असले तरी त्यांनी पुढे मात्र साम्यवादी जाणीवेने भरलेली कविता केली आहे.

सौंदर्यवादी कवींच्यामध्ये स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करणारे कवी म्हणून पु.शि. रेगे यांचा उल्लेख करावा लागेल. स्वत:ला केंद्रस्थानी कल्पूनच त्यांनी कवितेला आणि तिच्या घटकांना स्वत:भोवती पिंगा घालायला लावले आहे. रेग्यांनी अतिशय समर्थपणे स्त्रीचित्रे रंगविली आहेत. तिचे स्त्रीत्व पुरुषाच्या नजरेतून ते साजरे करतात. इतर निसर्गकवी निसर्गप्रतिमांमध्ये मानवी भाव शोधतात. रेगे मात्र मानवी प्रतिमांमध्ये निसर्गसौंदर्य शोधतात. स्त्री देह आणि निसर्ग यांच्यातील ऐक्य त्यांनी अत्यंत तरल आणि संवेदन पध्दतीने दाखविले आहे. रेग्यांची कविता रविकिरण मंडळाच्या रुळलेल्या वाटेने न जाणारी किंवा मर्ढेकरी नवकवितेचा माग न धरणारी स्वतंत्र पिंड जोपासणारी आहे. अत्यंत निसंकोचपणे रेग्यांनी शृंगारचित्रे रंगविली आहेत. काही कवितातून तरुणींचे वर्णन आहे तर काही कवितेत स्त्री सहवासाची ओढ व्यक्त झाली आहे. रेगे कल्पकतेने कवितेला ऐंद्रीय अनुभवाच्या पातळीवर नेतात. रेग्यांची सुखलोलूप वृत्ती आणि मोहशील स्वभाव अनेक कवितातून व्यक्त झाला आहे तो त्यांच्या स्वच्छंद वृत्तीचाच परिणाम आहे.

एकूणच मर्ढेकर, मुक्तिबोध आणि रेगे यांच्या काव्यातून मराठीतील नवकवितेची गंगोत्री त्रिवेणी रूपाने जोमदारपणे वाहू लागली.

नवकवितेच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात होत असताना विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, वंसत बापट यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी ठिकठिकाणी काव्य वाचनाचे जाहिर कार्यक्रम करुन रसिकामध्ये काव्याबद्दलची अभिरूची निर्माण केली. लोकांना कवितेकडे वळवले. विंदा करंदीकरांनी बालकविता, लघुनिंबध, समिक्षा, भाषांतर असे वाङ्मय निर्माण केले असले तरी, त्याचे स्वेदगंगा, मृदगंध हे काव्यसंग्रह महत्वाचे ठरतात. करंदीकरांच्या कवितेत कवी मर्ढेकरांची छाप असली तरी माणसाच्या अस्तित्वाबद्दल त्यांना कधीही प्रश्न पडत नाही. ते

निराशवादी मुळीच नव्हते. त्यांचा पारंपारिक भारतीय मुल्यांवर  विज्ञानावर आणि मानवतेवर विश्वास आहे. करंदीकरांनी राजकीय सामाजिक विषयावर सुध्दा कविता लिहिली आहे. 'माझ्या मना बन दगड 'असे म्हणत सामाजिक अन्याय, अत्याचाराचे वाभाडे ते काढतात. अमूर्त संवेदनशिलतेकडे ही त्याची कविता हळूवारपणे जाते. प्रयोगशील नाविन्य, भावनेची उत्कटता या अंगांनी विंदांनी मराठी कवितेला पुढे नेले आहे.

वसंत बापट यांची प्रवृत्ती मुक्तछंदाला जवळची असूनही शाहीरी बाजाचा ढंगदारपणा त्यांच्या काव्यात आला आहे. ते समाजवादी विचारसरणीचे कवी असल्याने त्यांची कविता समाजाची सुखदु:खे निष्ठेने मांडते. त्यांना आनंदाची ओढ आहे, सौख्याची कवणे गावीत असेही त्यांना वाटते. पण सामाजिक वास्तवातील आक्रंदणामुळे मन गोठून जात असल्याचा अनुभव त्यांना येतो. बापटांची कविता आशयाची सरळ अभिव्यक्ती करणारी आहे. तिला प्रतिमानिर्मितीचा सोस नाही.

इंदिरा संताचा समावेश नवकाव्याच्या दुसऱ्या पर्वात विशुध्द भावकविता लिहणारी कवयित्री म्हणूनच केला जातो. प्रत्यक्ष अनुभूतीचा क्षण आणि स्मृतीतील गतजीवन यांच्या मिलाफाचे व्यामिश्र प्रतिमांकन हे इंदिरा संताच्या प्रत्येक कवितेचे वैशिष्टय आहेत. अत्यंत तरल आणि नाजूक संवेदना त्यांनी टिपल्या आहेत. स्त्रीसुलभ प्रतिमांचा सुयोग्य वापर करुन त्या भावनेची अभिव्यक्ती करतात. त्यात कुठेही भडकपणा नाही. भावनांची आंदोलने चितारताना त्या मनोभूतीचे मनोज्ञ दर्शन घडवितात. त्या निसर्गाशी जवळीक करतात. त्यामूळे त्यांची कविता अधिक भावपूर्ण झाली आहे. त्यांच्या प्रेमकवितेत अस्फूट प्रेमाचे दर्शन होते. सहजसुंदर शब्दरचनेतून कवितेत सुक्ष्म अशा संवेदनांची अभिव्यक्ती केली आहे. त्यांच्या प्रतिमा अनुभवाशी एकरुप होवूनच येत असल्यामूळे त्या अधिक प्रभावी होतात. जातीवंत विशुध्द भावकविता हे त्यांच्या कवितेचे खास वैशिष्टय होय.

दिलीप चित्रे हे पराकोटीची आत्मनिष्ठा असणारे कवी आहेत. आशय अभिव्यक्तीच्या नव्या वाटा ते चोखाळतात. मात्र आत्मभावाची तीव्रता त्यात अधिक असते. चित्र्यांनी सुनित, गझल, गीत. असे रचनाप्रकारही हाताळले आहेत. त्यांच्या कवितातून रोमॅंटिक प्रतिमा येतात. तसेच चिंतनात्मक, भावनात्मक प्रतिमाही येतात. काही कवितातून सामाजिक वास्तवांचे भान मोठया विदारकपणे प्रत्ययाला येते आधुनिक मराठी कवितेतील एक विलक्षण



...KAR LIBRARY
...UNIVERSITY, KOLHAPUR.

झपाटून टाकणारी कविता असे चित्र्यांच्या कवितेला म्हटले जाते. चित्र्यांची कविता वास्तवाला सामोरी जाते. ऐद्रिय संवेदनांच्या माध्यमातून त्यांचा तो अनुभव विश्वानुभव होवून प्रतीत होतो. स्त्री-पुरुष संबधातील थेटपणा, मळमळ व्यक्त करणारे चित्रे पहिलेच कवी आहेत.

उपरोक्त नवकवींच्या कवितेशी मंगेश पाडगावकरांच्या कवितेचे जवळचे नाते आहे. पाडागावकर जीवनवादी, वास्तवादी आहेतच पण इतरांपेक्षा अधिक आशावादी आहेत. अत्यंत संवेदनशील मनाने त्यांनी अनुभव टिपले आहेत. हे त्यांची कविता वाचताना तीव्रतेने जाणवते. १९५० साली धरानृत्य हा पहिला कविता संग्रह निघाल्यापासून ते अखंडपणे काव्यलेखन करीत आहेत. काही बालकाव्यसंग्रह देखील प्रकाशीत झाली आहेत. पाडगावकर निसर्गाशी संबध्द कवी आहेत. त्यामूळेच त्यांचे बोरकर आणि बालकवीशी नाते आहे. तरल, कोमल निसर्गसंवेदना आणि कोवळया नाजूक प्रेम भावनेच्या छटा यांचा कवीला अत्यंत हव्यास आहे. नाजूक भावभावनांची सूक्ष्म अशी शब्दचित्रे त्यांनी काढली आहेत. त्यांच्या काही कवितातून सामाजिक जाणिवा आणि राजकीय विषय आलेले असले तरी त्यांची संख्या कमी आहे. 'जिप्सी' या काव्य संग्रहात तर त्यांची संख्या कमी आहे. 'जिप्सी' या काव्यसंग्रहात अशा कविता नाहीत. 'वात्राटिका' हा हलक्याफुलक्या विनोदी वळणाच्या कविता आणि गझल हे काव्यप्रकारही त्यांनी हाताळ्ले आहेत. तथापी पाडगावकरांचा मूळ पिंड कोमल भावभक्तीचा आणि मन सौंदर्यलक्षी असल्यामुळे त्यांची कविता सहज सुंदर अविष्कार करणारी, जीवनाबद्दल आशावादी असणारी आहे. प्रतिमा-प्रतिकांचा खूप हव्यास पाडगावकरांना नाही. तथापि अभिव्यक्तीला अनुरूप अशा सुंदर सुंदर प्रतिमा त्यांनी सहजतेने वापरल्या आहेत. वेगवेगळे अनुभव भावपूर्णारित्या अविष्कृत केले आहे. त्यामुळेच पाडगावकरांची कविता रसिकाला भावनारी, त्याच्या मनाला रिझवणारी सुंदर कविता आहे.

मंगेश पाडवागरांचे बालपण कोकणात वेंगुर्ल्यात गेले. हिरव्या चवऱ्या ढाळणारे उंच उंच माड, भताची कुरणे, लाल मातीच्या वळणावळणाच्या वाटा, पाणथळी, दाट वनराईतील पक्षी असा सुंदर निसर्ग असलेल्या परिसरात हा संवेदनशिल मनाचा आणि स्वप्नाळू वृत्तीचा बालक राहिला. मुलाची आवड लक्षात घेऊन आईने पण त्याला उत्तम साथ दिली. झाडावरुन सरसर जाणरी खार असो की वाऱ्याने घमघमणारे मोहक पुल असो दोन्ही त्याला आवडत असत. गवतावर डुलणारे चिमुकले फूल किंवा फूलपाखरु त्यांचे लक्ष वेधून घेई. नित्यनेमाने उगवणारा सुर्य त्याला नित्य नवाच भासे. या सूर्याची पाण्यात पडणारी प्रतिबिंबे,

वाऱ्याने डोलनारी माडाची झाडे इ. इ. सर्वांच्या प्रतिमा पाडगांवकरांच्या मनावर उमटून तो निसर्ग कायमचा कोरला गेला. त्यातील रंगाच्या, रुपाच्या, गंधाच्या, छायाप्रकाशाच्या, सूक्ष्मातिसूक्ष्म हालचाली त्यांच्या मनाने टिपकागदाराख्या दिपून घेतल्या. पुढे मुंबईत आल्यावर तरुणपणी कविता लिहताना या अबोधमनातील प्रतिमा सहज स्वाभाविकपणे कवितेत आल्या.

पाडगांवकराच्या पहिल्या धारातून 'धरानृत्य' मधील कविता वाचून त्यांच्या कल्पकतेचे, शब्दप्रभुत्वाचे, चोखंदळ सौंदर्यदृष्टीचे रसिकांना खूपच कौतूक वाटले. तथपि जाणकारांच्यामते या कवितेवर बालकवी, बोरकर ,कुसुमाग्रज या पूर्वसूरींच्या काव्याचा प्रभाव होता. परंतू 'जिप्सी' मधील कविता या प्रभावापासून मुक्त आहे. पाडगांवकरांना स्वत:चा स्वंतत्र सुर गवसला आहे. ज्या विशिष्ट भववृत्तीतून कवी त्या निसर्गदृश्याकडे पहातो त्या भववृत्तीची डुब आपोआपच त्या दृश्याला मिळालेली असते. अशी ही पाडगांवकरांची कविता वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

# - संदर्भ -


| | | | |
|---|---|---|---|
| १ | मे.श्री. पंडीत, 'अधुनिक मराठी कविता' सुविचार प्रकाशन मंडळ लि. नागपूर प्रथमावृत्ती डिसें. १९५२ | पृ.क्र. | २९९ |
| २ | उ.नि | पृ.क्र. | ३०२ |
| ३ | उ.नि. | पृ.क्र. | ३०३ |
| ४ | बा.सी. मर्ढेकरांची कविता मौज प्रकाशन | पृ.क्र. | ११२ |
| ५ | तत्रेव | पृ.क्र. | १५८ |
| ६ | तत्रेव | पृ.क्र. | १०८ |
| ७ | तत्रेव | पृ.क्र. | १०४ |
| ८ | तत्रेव | पृ.क्र. | १४७ |
| ९ | तत्रेव | पृ.क्र. | १४४ |
| १० | तत्रेव | पृ.क्र. | १४३ |
| ११ | तत्रेव | पृ.क्र. | १३५ |
| १२ | तत्रेव | पृ.क्र. | ५८ |
| १३ | बा.सी. मर्ढेकर - मर्ढेकरांची कविता | पृ.क्र. | ९४ |
| १४ | तत्रेव | पृ.क्र. | २९ |
| १५ | उ.नि. | पृ.क्र. | ९६ |
| १६ | निशिकांत ठकार - 'मराठी कविता स्वरूप आणि विवेचन', स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे - ३० | पृ.क्र. | ३४१ |
| १७ | अ.ना. देशपांडे 'अधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास' भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे | पृ.क्र. | ४२८ |
| १८ | निशिकांत ठकार, मराठी कविता: स्वरूप आणि विवेचन, स्वाध्याय महाविद्यायल प्रकाशन | पृ.क्र. | ३४६ |
| १९ | उ.नि | पृ.क्र. | ३४२-३४३ |
| २० | उ.नि. | पृ.क्र. | ३४३ |
| २१ | उ.नि | पृ.क्र. | २४३-३४४ |
| २२ | निशिकांत ठकार - मराठी कविता: स्वरूप आणि विवेचन, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे - ३० | पृ.क्र. | ३४६ |
| २३ | अ.ना. देशपांडे - 'अधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास' भाग २, व्हीनस प्रकाशन पुणे | पृ.क्र. | ४२८ |
| २४ | पु.शि. रेगे - गंधरेखा - हिमसेख | पृ.क्र. | १५९ |
| २५ | पु.शि. रेगे - दुसरा पक्षी | पृ.क्र. | १७ |
| २६ | संपा. गंगाधर पाटील - सुहृदगाथा | पृ.क्र. | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | पु.शि. रेगे - पुष्कळा | पृ.क्र. | १३१ |
| २८ | संपा. गंगाधर पाटील -सुहृदगाथा | पृ.क्र. | ८९ |
| २९ | तत्रेव | पृ.क्र. | ८९ |
| ३० | पु.शि. रेगे - दुसरा पक्षी | पृ.क्र. | ८६ |
| ३१ | भ.श्री. पंडीत, 'अधुनिक मराठी कविता' सुविचार प्रकाशन मंडळ लि. नागपूर | पृ.क्र. | ३०९ |
| ३२ | सुधीर रसाळ, 'काही मराठी कवी : जणिवा आणि शैली ' पुणे व्दितीयावृत्ती १९९६ | पृ.क्र. | १२९ |
| ३३ | अ.ना. देशपांडे - 'अधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास' भाग २, व्हीनस प्रकाशन पुणे | पृ.क्र. | ४३१ |
| ३४ | वसंत बापट - स्वातंत्र्य; कुठे स्वातंत्र्य? | पृ.क्र. | १०२ |
| ३५ | तत्रेव -(दिवाळी) | पृ.क्र. | ३१ |
| ३६ | तत्रेव - गांधी मंदिर | पृ.क्र. | ६२ |
| ३७ | निशिकांत ठकार - मराठी कविता स्वरूप आणि विवेचन, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे - ३० | पृ.क्र. | ३५४ |
| ३८ | इंदिरा संत- मेंदीं - 'वाट पहाते' | पृ.क्र. | ५५ |
| ३९ | तत्रेव - 'चंद्रकोर' | पृ.क्र. | ३२ |
| ४० | इंदिरा संत - मेंदी - 'हिरवे पिवळे तूरे उन्हाचे' | पृ.क्र. | ४६ |
| ४१ | दिलिप पुरुषोत्तम चित्रे - 'कवितेनंतरच्या कविता' वळसा | पृ.क्र. | ९२ |
| ४२ | दिलिप पूरुषोत्तम चित्रे - कविता (उ.नि.) | पृ.क्र. | २१ |
| ४३ | उ.नि. | पृ.क्र. | २२ |
| ४४ | निशिकांत ठकार - मराठी कविता स्वरूप आणि विवेचन, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन पुणे - ३० | पृ.क्र. | ३५२ |
| ४५ | मंगेश पाडगावकर, 'जिप्सी' गंधातून गुढ उकलते | पृ.क्र. | ५ |
| ४६ | मंगेश पाडगावकर - 'जिप्सी' 'जय जय हे पार्थिवते' | पृ.क्र. | ६० |